follow us : /rajdandlive

मराठी माणसाचा मानदंड

# राजदंड

www.rajdand.com

। पश्चिम महाराष्ट्र ।

RNI Regd. No. 72105/99 | वर्ष २५ | अंक १९८ | सातारा | बुधवार, दि. २७ मार्च २०२४ | पाने ६ (सुप्रभात) | किंमत ५/- रूपये

# भाजपाचं ठरलं; उदयनराजेंनाच तिकीट




## खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकरांची माहिती

**राजदंड / सातारा**

**गेल्या अनेक दिवसांपासून साताऱ्याच्या जागेवरून महायुती आणि महाविकास आघाडीमध्ये खलबतं सुरू आहेत. सातारा लोकसभेसाठी छत्रपती उदयनराजे भोसले यांची भाजपकडून उमेदवारी निश्चित करण्यात आली आहे, अशी माहिती भाजपचे विद्यमान खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांनी दिली आहे. उदयनराजेंची उमेदवारी निश्चित करण्यात आली असून उद्याच घोषणा होण्याची शक्यता असल्याची माहितीही नाईक निंबाळकरांनी माध्यमांशी बोलताना दिली. दरम्यान, भाजप नेते आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांसोबत झालेल्या भेटीनंतर निंबाळकरांनी ही माहिती दिली आहे. खासदार श्रीमंत छत्रपती उदयनराजे गेल्या काही दिवसांपासून तिकिटासाठी दिल्लीत ठाण मांडून आहेत.**

भाजपचे विद्यमान खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर बोलताना म्हणाले की, ''सातारा लोकसभेसाठी छत्रपती उदयनराजे भोसले यांची भाजपकडून उमेदवारी निश्चित करण्यात आली आहे. उद्या घोषणा होण्याची शक्यता आहे. पश्चिम महाराष्ट्र महायुतीच्या प्रचाराचा नारळ माढा लोकसभेतील माळशिरस येथे फुटणार आहे.'' तसेच, यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार आणि सर्व सहयोगी पक्षाचे नेते उपस्थित राहणार असल्याचंही त्यांनी सांगितलं. यानंतर उपमुख्यमंत्री आपले कुलदैवत असणाऱ्या निरा नरसिंहपूर येथे जावून नरसिंहाचं दर्शन घेणार असल्याचंही त्यांनी सांगितलं.

### सातारा सोडतो, नाशिक आम्हाला द्या; अजित पवार गटाची मागणी

साताऱ्यात उद्या उदयनराजेंचा भव्य सत्कार केला जाणार आहे, असे पोस्टर्स फिरू लागले आहेत. तर दुसरीकडे राष्ट्रवादीला बारामती, रायगड, शिरूर, नाशिक आणि परभणी या पाच जागा मिळणार अशी माहिती मिळत आहे. म्हणूनच, राष्ट्रवादीने साताऱ्यावरील आग्रह सोडला का? असा प्रश्न निर्माण होत आहे. दुसरीकडे सातारा लोकसभा भाजपला सुटत असेल तर बदल्यात नाशिक आम्हाला सोडा, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस भाजपकडे करत असल्याचंही समोर आलं आहे.

नाशिक लोकसभेत भाजपचे तीन आमदार आहेत. राष्ट्रवादीचे दोन आमदार तर काँग्रेसचा एक आमदार आहे. त्यामुळे ही जागा आम्हाला मिळाली पाहिजे, अशी भाजपची मागणी आहे. दुसरीकडे सातारा लोकसभा भाजपला सुटत असेल तर बदल्यात नाशिक आम्हाला सोडा, अशी राष्ट्रवादीची भूमिका आहे. यामध्ये एकनाथ शिंदेंची मात्र मोठी अडचण झाली आहे. नाशिकमध्ये तुमची ताकद नाही त्यामुळे ती जागा आम्हाला सोडा अशी भाजप आणि राष्ट्रवादीची भूमिका आहे. पण हेमंत गोडसे हे शिवसेनेचे विद्यमान खासदार असताना आम्ही नाशिक लोकसभा सोडणार नाही, अशी शिंदेंची भूमिका आहे.

### साताऱ्यात झळकले उदयनराजेंचे पोस्टर्स

उद्या उदयनराजेंचा साताऱ्यात भव्य स्वागत सोहळा पार पडणार आहे. शिरवळपासून साताऱ्यात ठिकठिकाणी स्वागत केलं जाणार आहे. अद्याप उदयनराजेंना पक्षाकडून उमेदवारी जाहीर करण्यात आलेली नाही. अशातच तिकीट जाहीर होण्याअगोदरच उदयनराजेंच्या स्वागताची जय्यत तयारी सुरू आहे. यामुळे राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आलं आहे. भाजपकडून 'ग्रीन सिग्नल' मिळाल्याची माहिती मिळाली असल्याचं कार्यकर्त्यांचं म्हणणं आहे.

## थकित मिळकतकर वसुलीसाठी थकबाकीदारांच्या घरापुढे 'बँडवादन'

**राजदंड न्यूज नेटवर्क / पुणे**



### महापालिकेकडे २,१६८ कोटींहून अधिक कर जमा

आर्थिक वर्षाच्या शेवटच्या आठवड्यात थकीत मिळकतकर वसूल करण्यासाठी पुणे महापालिकेने कडक पावले उचलली आहेत. त्याच धर्तीवर यंदाही थकबाकीदारांना नोटीस बजावणे, थकबाकीदारांच्या घरासमोर बँड वाजवणे, मिळकती जप्त करणे, जप्त मिळकतींचा लिलाव करणे आदी उपाययोजना केल्या जात आहेत. त्यामुळे सोमवारी सायंकाळपर्यंत २,१३८ कोटी ६५ लाख रुपयांहून अधिक मिळकतकर पुणे महापालिकेकडे जमा झाला आहे.

आर्थिक वर्षाच्या शेवटच्या आठवड्यात थकीत मिळकतकर वसूल करण्यासाठी महापालिकेने कडक पावले उचलली आहेत. आतापर्यंत एकूण तीन हजारहून अधिक मिळकती जप्त करण्यात आल्या आहेत. थकबकीदारांच्या घरापुढ बँडही वाजवला जात आहे. त्याचा परिणाम म्हणून सोमवारी सायंकाळपर्यंत २,१३८ कोटी ६५ लाख रुपयांहून अधिक मिळकतकर जमा झाला आहे.

मिळकतकर पालिकेच्या उत्पन्नातील सर्वांत महत्त्वाचा आणि मोठा स्रोत आहे. त्यामुळे मिळकतकराचे संकलन वाढविण्यासाठी पालिकेच्या करआकारणी आणि करसंकलन विभागातर्फे विविध उपाययोजना केल्या जातात. त्याच धर्तीवर यंदाही थकबाकीदारांना नोटीस बजावणे, थकबाकीदारांच्या घरासमोर बँड वाजवणे, मिळकती जप्त करणे, जप्त मिळकतींचा लिलाव करणे आदी उपाययोजना केल्या जात आहेत.

या उपाययोजनांमुळे सोमवारपर्यंत पुणे महापालिकेकडे मिळकतकरापोटी सुमारे २,१३८ कोटी ६५ लाख २४ हजार १५० रुपये मिळकतकर जमा झाला आहे. चालू आर्थिक वर्षात कोणतीही अभय योजना नसताना आणि २०१९ नंतरच्या सर्व मिळकतींना ४० टक्के सवलत दिलेली असतानाही महापालिकेने मिळकतकर संकलनात गेल्या वर्षीच्या तुलनेत आघाडी घेतली आहे. गत वर्षी २५ मार्चपर्यंत पालिकेकडे १,८२५ कोटी १४ लाख ९० हजार ६२५ रुपये मिळकतकर जमा झाला होता. यंदा याच तारखेला पालिकेकडे २,१३८ कोटी ६५ लाख २४ हजार १५० रुपये जमा झाले आहेत. त्यामुळे गेल्या वर्षीच्या तुलनेत पालिकेला आतापर्यंत ३१३ कोटी रुपये अधिक मिळाले आहेत.

## ज्योती मेटेंची लोकसभा लढवण्याची घोषणा, थेट पंकजा मुंडेंशी होणार सामना

**राजदंड / बीड**

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर चर्चेत आलेल्या विनायक मेटे यांच्या पत्नी ज्योती मेटे यांनी अखेर लोकसभा निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी ज्योती मेटे यांनी शासकीय नोकरीचा राजीनामा दिला असून, लोकसभा निवडणूक लढवण्यावर ठाम असल्याची अधिकृत भूमिका त्यांनी आज स्पष्ट केली आहे. तसेच याबाबत आपण लवकरच आपली भूमिका जाहीर करणार असल्याचं देखील ज्योती मेटे यांनी म्हटले आहे. त्यामुळे बीड लोकसभा मतदारसंघातून पंकजा मुंडे विरुद्ध ज्योती मेटे असाच सामना रंगणार असल्याचे जवळपास स्पष्ट झाले आहे.

महविकास आघाडीच्या माध्यमातून बीड लोकसभा निवडणुकीसाठी ज्योती मेटे यांच्या नावाची चर्चा आहे. मात्र, ज्योती मेटे महविकास आघाडीकडून निवडणूक लढतील की अपक्ष लढतील यात संभ्रम आहे. ज्योती मेटे यांनी आज शिवसंग्रामच्या पदाधिकाऱ्यांची महत्त्वाची बैठक घेतली. यात लोकसभा निवडणुकीवरून चर्चा करण्यात आली. कोणत्या पक्षाकडून निवडणूक लढवायची किंवा अपक्ष उमेदवारी दाखल करायची याबाबत दोन दिवसात ज्योती मेटे निर्णय घेण्याची शक्यता आहे. विशेष म्हणजे लोकसभा निवडणूक लढण्यासाठी आपण ठाम असल्याचे मेटे यांनी म्हटले आहे.

## महादेव जानकरांना पाठिंबा देतोय ही केवळ अफवा, कोणत्याही परिस्थितीत बारामतीचा उमेदवार बदलणार नाही!

### अजित पवारांचे 'एक घाव दोन तुकडे'

**राजदंड / पुणे**

रासपचे नेते महादेव जानकर महायुतीमध्ये आल्यानंतर त्यांना अजित पवार गट पाठिंबा देणार, बारामतीचा उमेदवार बदलणार या चर्चावर आता स्वत: अजित पवारांनीच स्पष्टीकरण दिले आहे. राष्ट्रवादीने महादेव जानकरांना पाठिंबा दिला ही विरोधकांनी पसरवलेली अफवा असल्याचे सांगत बारामतीचा उमेदवार बदलणार नाही, असे अजित पवारांनी स्पष्ट केले. त्यामुळे आता बारामतीमधून महायुतीच्या तिकिटीवर अजित पवारांच्या पत्नी सुनेत्रा पवार याच लढणार, असे अप्रत्यक्षपणे अजित पवारांनी सांगितले.

**बारामतीचा उमेदवार बदलणार नाही**

राज्यातील महायुतीच्या जागावाटप अद्याप जाहीर झाले नाही. त्या



पार्श्वभूमीवर अजित पवारांनी माध्यमांशी संवाद साधला. ते म्हणाले की, आजच्या पुण्यातील बैठकीत बारामती, शिरूर, सातारा , धाराशिव, नाशिक, रायगड, परभणी लोकसभा संदर्भात चर्चा झाली. परभणीचा उमेदवार दोन दिवसात ठरणार. महादेव जानकर यांना राष्ट्र्वादी पाठिंबा देणार ही केवळ अफवा असून ती विरोधकानी पसरवली आहे. कोणत्याही परिस्थितीत बारामतीचा उमेदवार बदलणार नाही.

अजित पवार म्हणाले की, तिन्ही पक्षांनी एकत्रित चर्चा करुन महायुतीत जागावाटपाचे ९९ टक्के काम पूर्ण केले आहे. २८ तारखेला मुंबईत देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे आणि मी पत्रकार परिषद घेऊन उमेदवार जाहीर करणार. रायगडमधून सुनील तटकरे निवडणूक लढविणार आहेत. आढळराव पाटील २० वर्षापूर्वी आमच्या पक्षातून शिवसेनेत गेले होते. त्यांचा पक्षप्रवेश आज होणार आहे. इतर उमेदवारांची नावे २८ तारखेला जाहीर करण्यात येणार.

बारामतीमधून विजय शिवतारे यांनी लोकसभेला लढण्याची घोषणा केली आहे. त्यानंतर त्यांनी अजित पवारांवर टीकाही केली. त्यावर बोलताना विजय शिवतारेंचा निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे घेतील असे अजित पवारांनी सांगितले.

राष्ट्रवादीच्या प्रत्येक आमदारांना त्यांच्या मतदारसंघाची जबाबदारी देण्यात आली आहे. त्या आमदारासोबत आणखी पाच ते सहा जणांची टीम असेल. निवडणुकीचे प्रचार नियोजन कसे असावे हे ठरवण्यात आले आहे असेही अजित पवार यांनी सांगितले.

### बारामतीमध्ये तुमच्या मनातला उमेदवार

**कारण नसताना पत्रकारांनी राष्ट्रवादीला तीन किंवा चारच जागा लढविण्यास मिळणार, अशा खोट्या बातम्या चालवल्या. बारामतीचा उमेदवार २८ तारखेला जागा जाहीर करतो. तुमच्या मनात जो उमेदवार आहे, तोच आमचा उमेदवार असेल. सातारची जागा अजून जाहीर झालेली नाही. उदयनरांजेना सांगण्याचे काम भाजपचे नेते करतील. नरेंद्र मोदींना तिसऱ्यांदा पंतप्रधान करायचं, याच हेतून आम्ही सध्या काम करतोय.**

## शिवाजीराव आढळराव पाटलांचा राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटात प्रवेश

### शिरूर लोकसभेचे तिकिट पक्कं

**राजदंड / पुणे**

संयुक्त शिवसेनेचे शिरूर लोकसभा मतदारसंघाचे माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांनी मंगळवारी (२६ मार्च) राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये (अजित पवार गट) प्रवेश केला. शिरूर मतदारसंघातील मंचर येथील शिवगिरी मंगल कार्यालयात उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा अजित पवार यांच्या उपस्थितीत हा पक्षप्रवेशाचा कार्यक्रम पार पडला. यावेळी राज्याचे सहकारमंत्री दिलीप वळसे-पाटील, खेडचे आमदार दिलीप मोहिते-पाटील देखील उपस्थित होते.

दिलीप मोहिते पाटील आणि शिवाजीराव आढळराव पाटील यांच्यात गेल्या अनेक वर्षांपासून राजकीय संघर्ष चालू होता. परंतु, राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वे सर्वा अजित पवार यांच्या यशस्वी




मध्यस्थीनंतर दोन्ही नेत्यांमधला वाद आता मिटला आहे. त्यामुळे शिवाजीराव आढळराव पाटलांच्या पक्षप्रवेशाच्या कार्यक्रमाला दिलीप मोहिते पाटीलदेखील उपस्थित होते. शिवाजीराव आढळरावांच्या प्रचारालाही मोहिते-पाटील उपस्थित असतील. आमच्या मतदारसंघातून आढळरावांना पूर्ण पाठिंबा मिळेल असंही मोहिते पाटलांनी यावेळी सांगितलं. तसेच त्यांनी आढळरावांना आमच्यावर अविश्वास दाखवू नका, असंही सांगितलं.

दिलीप मोहिते पाटील म्हणाले, शिवाजीराव आढळराव पाटलांना मी एवढीच विनंती करणार आहे की जसे अजित पवार माझ्या मागे उभे राहिले, तसेच तुम्हीदेखील राहा. नाहीतर पुन्हा एकदा माझ्या तालुक्यात शिवाजीराव आढळराव पाटलांचा एक गट तयार होईल. मग आमचं कल्याण झालं म्हणून समजा त्यामुळे मी शिवाजीराव आढळराव पाटलांना एवढंच सांगतो की मागे (लोकसभा निवडणूक २०१९) अजित पवार यांनी आम्हाला सांगितलं होतं की, अमोल कोल्हे यांना खासदार करायचं आहे, तेव्हा आम्ही दिवसाची रात्र केली, सर्वांनी मेहनत घेतली, त्यांना खासदार केलं. आता तुम्ही आमच्यावर थोडा विश्वास ठेवा. आम्ही तुमचं काम केल्याशिवाय राहणार नाही. पण एवढंच सांगतो की, तुम्ही अविश्वास दाखवलात तर माझं नाव दिलीप मोहिते पाटील आहे.

दरम्यान, यावेळी दिलीप मोहेते पाटील यांच्या भाषणानंतर शिवाजीराव आढळराव पाटील यांनीदेखील भाषण केलं. तेव्हा शिवाजीराव म्हणाले, राजकारण करत असताना दोन नेते आमने-सामने असतातत तेव्हा भांड्याला भांडं लागतंच. परंतु, राजकारणातली समीकरणं बदलल्यानंतर सगळं काही विसरून आपण एकदिलाने नवीन समीकरणाशी जुळवून घेतो आणि काम करतो. तसे आमचे दिलीप मोहिते-पाटील स्वभावाने खूप चांगले आहेत. आमचे वैयक्तिक हेवेदावे कधीच नव्हते. जे काही झालं ते केवळ लोकांची काम करत असताना झालं.

## चोराडे सोसायटीच्या रेशनिंग दुकानावर जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांची कारवाई

### दुकानाची अनामत रक्कम जप्त व दहा हजारांचा ठोठावला दंड

### रेशनिंग दुकानाचे फेर चौकशीचेही आदेश...

**राजदंड / वडूज**

खटाव तालुक्यातील चोराडे येथील विकास सेवा सोसायटीच्या रेशनिंग दुकानाची दिनांक १ नोव्हेंबर २०२३ रोजी पुरवठा निरीक्षकांनी तपासणी केली होती. त्यानंतर वडूज तहसीलदारांनी पुढील कारवाईसाठी हे प्रकरण जिल्हा पुरवठा विभागाकडे वर्ग केले होते. त्यानंतर जिल्हा पुरवठा विभागाच्या प्रमुख वैशाली राजमाने यांनी सदर दुकानाची अनामत रक्कम जप्त करून दहा हजार रुपयांचा दंड ठोठावला आहे. शिवाय फेर चौकशीचे आदेशही दिले आहेत.

याबाबत अधिक माहिती अशी, चोराडे येथील विकास सेवा सोसायटीच्या रेशनिंग दुकानातील झालेल्या गहू व तांदळा च्या अपहाराबाबतच्या निकाल पत्रात जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांनी आदेशात रास्त भाव दुकानदार



यांनी केलेला खुलासा अंशतः मान्य करणेत येत असून रास्त भाव दुकानाची १००% अनामत रक्कम जप्त करणेत येत आहे. रास्त भाव दुकानदार यांनी रास्त भाव दुकानात धान्य पोहोच झाले नसताना, आगाऊ पावत्या ई-पॉस मशीनवर काढले बाबत १० हजार रुपये इतका दंड करणेत येत आहे. तसेच भविष्यात अशी बाब निदर्शनास आलेस अथवा तपासणी मधील दोषांची पुनरावृत्ती होत असलचे निदर्शनास आलेस रास्त भाव दुकानाचा परवाना कायमस्वरुपी रद्द केला जाईल अशी सक्त ताकीद रास्त भाव दुकानदार यांना देणेत येत आहे.

सदर आदेशाची अंमलबजावणी तात्काळ करून कार्यवाही करावी, असा आदेश जिल्हा पुरवठा अधिकारी वैशाली राजमाने यांनी दिला आहे.

# राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटासह भाजपचा पाण्यासाठीचा श्रेयवाद...

## तारळीचे सोडलेले पाणी नगण्य प्रमाणात

**राजदंड / मसूर**

दोन दिवसांपूर्वी कोपर्डी लिंक कॅनॉलमधून तारळी धरणाचे पाणी सोडण्यात आले. पाणी सोडण्यासंदर्भात राजकीय श्रेयवाद उफाळला. पाणी आमच्याच प्रयत्नाने कालव्यात सोडले गेले. असा दावा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गट व भाजपने ठोकला आहे. दोन्हीही पक्षाकडून मोठ्या समारंभपूर्वक पाण्याचे जलपूजन केले. मात्र कालव्यात आज सोडलेले पाणी मसूर विभागात अगदीच पाणी कमी प्रमाणातच आहे. पाण्याची वाट पाहणाऱ्या २५ गावांच्या शेतकऱ्यांना अखेर म्हणावा तसा दिलासा मिळाला नाही.

१८ मार्चपर्यंत तारळीचे तातडीने काम पूर्ण करून डाव्या कालव्यात पाणी सोडण्याची

**आरफळ कालव्यात रोटेशन प्रमाणे पाणी सोडण्यात येत नाही. २५ एप्रिल ते ५ मे पर्यंत पाणी सोडण्याचे रोटेशन आहे. त्यावेळी तरी पाणी सोडणार का? हा प्रश्न शेतकऱ्यांना आहे. रब्बी हंगाम तर पाण्याविना वायाच गेला. शेतकऱ्यांच्या पदरी काहीच पडले नाही. आता उसाच्या आशेवर बसलेला शेतकरी पाण्याच्या आशेवर आहे.**



ग्वाही जिल्हाधिकाऱ्यांनी दिली होती. त्यानुसार आरफळच्या डाव्या कालव्यात जागतिक जलदिनी पाणी सोडण्यात आले. पाणी सोडण्यासंदर्भात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गट व भाजपने आपापल्या पद्धतीने स्वतंत्ररीत्या

**तारळी धरणाचे पाणी सोडण्यासंदर्भात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गट व भाजपचा श्रेयवाद उफाळला आहे. पाणी आमच्यामुळेच कालव्यात आले. याबाबत दावा ठोकला आहे असे असले तरी शेतकरी मात्र अनभिज्ञ आहे. अजूनही कालव्यात पाणी नगण्य स्वरूपातच आहे. कोणाच्यातरी प्रयत्नाने पाणी येऊ देत पण येऊ दे. पाण्याच्या आशेवर बसलेला शेतकरी बोलून जात आहे.**

पाणी सोडण्यासंदर्भात जिल्हाधिकाऱ्यांच्याकडे मागणी केली होती. तारळी धरणाचे सोडण्यात आलेले पाणी आज मसूर विभागात अगदीच नगण्य प्रमाणात पोहोचले. कालव्यात पाणी उशिरा येण्यामागे एअरवॉलचा टेक्निकल प्रॉब्लेम झाला असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. एअरवॉल दुरुस्त करण्याचे काम सुरू होते. सद्यस्थितीत पाण्याची आतुरतेने वाट पाहणाऱ्या मसूर भागातल्या २५ गावांचा पाण्याचा प्रश्न मोठा बिकट बनला आहे.

# निवडणुकीतील गैरप्रकारांवर १३५ भरारी पथके आणि १२९ स्थिर सर्वेक्षण पथकांचे लक्ष

**राजदंड / पुणे**

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ दरम्यान उमेदवार आणि राजकीय पक्षांच्या निवडणूक खर्चावर आणि निवडणुकीतील गैरप्रकारांवर लक्ष ठेवण्यासाठी जिल्ह्यात १३५ भरारी पथके आणि १२९ स्थिर सर्वेक्षण पथकांची स्थापन करण्यात आली आहेत, अशी माहिती तक्रार निवारण कक्षाद्वारे देण्यात आली आहे.

खर्च संनियंत्रणासाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्या अधिनस्त जिल्हास्तरावर समन्वय अधिकारी नेमण्यात आले असून प्रत्येक मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या स्तरावर खर्च पथक नेमण्यात आले आहे. या पथकाचे काम अन्य विविध पथकांच्या समन्वयाने चालते. भरारी पथक (एफएसटी), स्थिर सर्वेक्षण पथक (एसएसटी), व्हिडीओ सर्वेक्षण पथक (व्हिएसटी), व्हिडीओ पाहणी पथक (व्हिव्हिटी), माध्यम संनियंत्रण आणि प्रमाणीकरण समिती (एमसीएमसी), जिल्हा नियंत्रण कक्ष व तक्रार संनियंत्रण कक्ष आदीदेखील खर्च पथकाला सहकार्य करतात. तसेच त्यासाठी आयकर विभाग आणि राज्य उत्पादन शुल्क विभागाचीदेखील या कामात मदत घेतली जाते.

जिल्ह्यातील चार लोकसभा मतदार संघाअंतर्गत २१ विधानसभा मतदार संघात मिळून एकूण १३५ एफएसटी पथक आणि १२९ एसएसटी पथके स्थापन करण्यात आली आहेत. भोर मतदार संघात १५ आणि इतर २० मतदार संघात प्रत्येकी ६ एफएसटी स्थापन करण्यात आली आहेत. तसेच भोर विधानसभा मतदार संघात ९ आणि उर्वरित विधानसभा मतदार संघांमध्ये प्रत्येकी ६ एसएसटी स्थापन करण्यात आली आहेत.

या पथकांद्वारे मतदारांना प्रभावित करण्यासाठीची रोकड, मद्य, तसेच प्रतिबंधित पदार्थांच्या वाहतुकीस आळा घालणे, आचारसंहिता भंगाबाबत घटनांवर लक्ष देणे, निवडणुकीतील गैरप्रकारांची माहिती घेणे, सिव्हिजिल आणि नियंत्रण कक्षाकडे आलेल्या तक्रारींवर कार्यवाही आदी कामे करण्यात येतात.

उमेदवार, राजकीय पक्षांच्या प्रचाराच्या सर्व जाहीर सभा, रॅली यांचे व्हिडीओ चित्रीकरण व्हिएसटीच्या माध्यमातून केले जाते व त्याची पाहणी व्हिव्हिटीकडून केली जाते. प्रत्येक विधानसभा मतदारसंघात ३ व्हिएसटी आणि २ व्हीव्हीटी नेमण्यात आल्या आहेत. या पथकाची निरीक्षणे खर्च पथकासाठी उपयुक्त ठरतात. एमसीएमसीद्वारे उमेदवारांच्या वृत्तपत्रे तसेच इलेक्ट्रॉनिक माध्यमातील जाहिरात खर्चाचा अहवाल समितीकडे पाठविला जातो. या विविध माध्यमातून उमेदवारांनी दर्शविलेला निवडणूक खर्चाची पडताळणी केली जाते. खर्च दर्शविण्यात आला नसल्यास त्याबाबतची नोटीस देऊन त्याच्या निवडणूक खर्चात समाविष्ट केला जातो.

प्रत्येक विधानसभा मतदार संघासाठी सहायक खर्च निरीक्षक नेमण्यात येतो. केंद्र शासनाच्या आयकर विभाग, केंद्रीय उत्पादन शुल्क विभाग, केंद्रीय लेखापरीक्षा व लेखा विभाग किंवा केंद्रीय सार्वजनिक उपक्रमाचे अधिकाऱ्यांची नेमणूक सहायक खर्च निरीक्षक म्हणून होते. ते विधानसभा मतदार संघातील खर्च तपासणीचे काम योग्य पद्धतीने चालले आहे का याची पाहणी करणे आणि खर्च निरीक्षक व जिल्हा निवडणूक अधिकारी यांना खर्च पडताळणीसाठी सहकार्य करण्याचे काम करतात. तसेच उमेदवारांच्या खर्च नोंदवहीची तसेच शॅडो ऑब्झर्वेशन रजिस्टरचे संनियंत्रण करतात, अशीही माहिती जिल्हा निवडणूक प्रशासनाच्यावतीने देण्यात आली.

# शिवजयंती उत्सवानिमित्त नारायणगाव येथे शस्त्र प्रदर्शन

### विद्यार्थी, युवक व इतिहासप्रेमींची शस्त्र प्रदर्शनाला भेट



**राजदंड / नारायणगाव (सा.वा.)**

नारायणगाव येथील राजे शिवछत्रपती प्रतिष्ठान शिवजयंती उत्सव दरवर्षी मोठ्या उत्साहात साजरा करीत असते. या अनुषंगाने तिथीनुसार साजऱ्या होणाऱ्या शिवजयंती उत्सवानिमित्त नारायणगाव येथे विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले.

यानिमित्ताने स्वराज्य उभारणीत योगदान असणाऱ्या व अटकेपार झेंडा फडकविणाऱ्या मराठा सरदारांचे शस्त्र व इतर ऐतिहासिक वस्तूंचे भव्य प्रदर्शन येथील मुक्ताई समाजमंदिरात आयोजित करण्यात आले आहे., यानिमित्ताने नारायणगाव परिसरातील शालेय विद्यार्थी, युवक व इतिहास प्रेमींनी या शस्त्र प्रदर्शनाला भेट दिली. परिसरातील शेकडो विद्यार्थ्यांनी व इतिहास प्रेमींनी या प्रदर्शनात असलेल्या विविध ऐतिहासिक शस्त्रे तसेच पुरातन वस्तू पाहण्याचा लाभ घेतला हे प्रदर्शन पुढील दोन दिवस सुरू राहणार आहे अशी माहिती राजे शिवछत्रपती प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष व विद्यमान उपसरपंच योगेश बाबू पाटे यांनी दिली.

# कमी टक्केवारीच्या मतदान केंद्रांपर्यंत पोहोचून स्वीपद्वारे मतदान वाढीसाठी प्रयत्न करावेत - एस. चोक्कलिंगम

**राजदंड / पुणे**

कमी मतदान असलेला जिल्हा किंवा मतदार संघस्तरावर स्वीप कार्यक्रम मर्यादित न ठेवता कमी मतदान असलेल्या मतदान केंद्रापर्यंत पोहोचून तेथील मतदान टक्केवारी वाढविण्यासाठी स्वीपच्या माध्यमातून प्रयत्न करावेत, असे निर्देश प्रधान सचिव तथा राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी दिले.

यशदा येथे आयोजित स्वीप नोडल अधिकाऱ्यांच्या राज्यस्तरीय कार्यशाळेत ते बोलत होते. यावेळी भारत निवडणूक आयोगाचे स्वीप संचालक संतोष अजमेरा, जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे, आयोगाच्या वरीष्ठ स्वीप सल्लागार अनुराधा शर्मा आदी उपस्थित होते.

चोक्कलिंगम म्हणाले, भारत निवडणूक आयोगाच्या भूमिका सुरुवातीच्या काळातील नियंत्रक, अंमलबजावणी करणारी संस्था ते आता मतदान जनजागृतीपर्यंत विस्तारल्या आहेत. निवडणूक आयोग जनजागृतीसाठी आता मतदान कमी असलेल्या राज्यापर्यंतच नव्हे तर कमी असलेल्या शहरांपर्यंत पोहोचला आहे. आता सर्वांना मिळून कमी मतदान केंद्रापर्यंत पोहोचून तेथे ९० टक्क्याहून अधिक मतदान कसे होईल यासाठी प्रयत्न करायचे आहेत.

ते पुढे म्हणाले, संविधाननिर्मितीनंतर मतदानाचा अधिकार प्रत्येक नागरिकाला मिळाला. युरोपातील काही देशांच्या आधीच संविधानाने आपल्याला मताचा अधिकार दिला. या पार्श्वभूमीवर सुशिक्षित नागरिकांच्या मतदानाप्रती उदासीनतेमुळे शहरात कमी मतदान होत आहे. शहरी भागातील मतदानाचे प्रमाण वाढविण्यासाठी भारत निवडणूक आयोग आणि मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयामार्फत विविध



प्रयत्न होत असून राज्यात मुंबई, पुणे, ठाणे या शहरात गृहनिर्माण सोसायट्यांमध्ये १५१ मतदान केंद्रे स्थापन करण्यात येणार आहेत, अशी माहिती त्यांनी दिली.

सुरूवातीला केवळ मतदान जागृतीचे उपक्रम साजरे करण्यापर्यंत मर्यादित असलेला स्वीप उपक्रम मतदानविषयक माहितीचे विश्लेषणानुसार करावयाच्या उपाययोजनांपर्यंत पोहोचला आहे. आता मतदानाची टक्केवारी, मतदारांचा सहभाग कमी पडू नये याला महत्त्व आले आहे. यासाठी त्यातील कमतरता शोधून त्याकडे विशेष लक्ष केंद्रित करावे लागेल. पुणे जिल्ह्याने स्वीप उपक्रमात खूप चांगले काम केल्याचेही श्री. अजमेरा यावेळी म्हणाले.

शहरी नागरिकांच्या वर्तनशास्त्राचा अभ्यास केला असता त्यांच्यात मतदानासाठी प्रवास करण्याची मानसिकता नसणे, मतदानाच्या दिवसाला सुट्टीचा दिवस मानणे असे विश्लेषणात समोर आल्यामुळे ही मानसिकता बदलण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येत आहेत.

देशात राष्ट्रीय सरासरीपेक्षा कमी मतदान असलेल्या ८ राज्यात महाराष्ट्र तिसऱ्या क्रमांकावर आहे. त्यातही ३ लोकसभा मतदार संघ ५० टक्क्याहून कमी मतदानाचे, १३ मतदारसंघ ५० ते ६० टक्के, २२ मतदार संघ ६० ते ६५ टक्के मतदान, तर ६५ टक्क्यावर मतदान असलेले १० मतदार संघ आहेत. मुंबई, पुणे, ठाणे शहरात राष्ट्रीय सरासरीपेक्षा खूप कमी मतदान होते. मतदान टक्केवारी वाढविण्यासाठी स्वीप उपक्रमांवर भर देणे आवश्यक असून चांगले काम केलेल्या जिल्ह्यांचा आयोगाकडून सन्मान केला जातो, असेही अजमेरा यांनी सांगितले.

आयोगाने शैक्षणिक संस्था, पेट्रोलिअम असोसिएशन, डाक कार्यालये, बँक असोसिएशन, नागरी विमान संचालनालय, रेल्वे आदींबरोबर स्वीपसाठी सामंजस्य करार केले असून जिल्ह्यांनीही मतदार जागृतीचे उपक्रम राबवावेत, असे श्री. अजमेरा म्हणाले.

यावेळी जिल्ह्यांच्या स्वीप समन्वय अधिकाऱ्यांनी आपल्या जिल्ह्यात स्वीप अंतर्गत राबविण्यात येत असलेल्या उपक्रमांबाबत सादरीकरण केले.

# वडगावात दगडी गोटी उचलणे स्पर्धेत सौरभ ढोरेचा २८५ बैठकांचा विक्रम

### जय बजरंग तालीम मंडळ ट्रस्टच्या वतीने आयोजन

**राजदंड / वडगाव मावळ**

होळी व धूलिवंदन सणानिमित्त जय बजरंग तालीम मंडळ ट्रस्टतर्फे पारंपारिक शिवकालीन मर्दानी स्पर्धेचे आयोजन केले होते यामध्ये दगडी गोटी खांद्यावर घेऊन २८५ बैठका मारुन सौरभ नामदेव ढोरे यांनी रचला नविन विक्रम सौरभ ढोरे स्व. पै. केशवराव ढोरे यांच्या स्मरणार्थ वस्ताद उमेश ढोरे यांच्यावतीने चांदीची गदा देण्यात आली. तसेच मोरया प्रतिष्ठान यांच्या वतीने चांदीचे कडे देण्यात आले. व अमित मुसळे यांच्या वतीने मोठ्या गोटीवर बैठक मारणाऱ्या खेळाडूला ट्रॉफी देण्यात आली.

वडगाव मावळ येथील ग्रामदैवत तीर्थक्षेत्र पोटोबा महाराज मंदिराच्या प्रांगणात सोमवारी सकाळी ९ वाजता शिवप्रतिमेच्या पूजन व मानाची दगडी गोटी पूजन पोटोबा देवस्थानचे उपाध्यक्ष





गणेशआप्पा ढोरे, विश्वस्त चंद्रकांत ढोरे, किरण भिलारे, सुनिलभाऊ चव्हाण, खरेदी विक्री संघाचे उपाध्यक्ष अमोल भोईरकर, संचालक गणेश विनोदे, शिवजयंती उत्सव समितीचे अध्यक्ष अनंता कुडे, बिहारीलाल दुबे, सुधीर म्हाळसकर, वस्ताद उमेश ढोरे आदींच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी आमदार सुनील शेळके, बाबुराव वायकर, भास्करराव म्हाळसकर, पंढरीनाथ ढोरे, सिनेअभिनेते प्रतीक मोहीते, अशोक सरपाटील, सुधाकर ढोरे, बापूसाहेब वाघवले, किरण म्हाळसकर, दिनेश ढोरे, दिलीप म्हाळसकर, विलास दंडेल, राजेंद्र वहीले, रवींद्र काकडे, अर्जुन ढोरे, खंडू भिलारे, अतिश ढोरे दिलीप चव्हाण बाळासाहेब तुमकर आदी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**स्व.पै केशवराव ढोरे क्रीडा पुरस्काराने गौरव**

यावेळी गुणवंत खेळाडूंना स्व. पै. केशवराव ढोरे क्रीडा पुरस्कार देऊन या मध्ये नितीन म्हाळसकर, सौरभ ढोरे व सुरेंद्र भिलारे या गत विजेत्या खेळाडूंना गौरविण्यात आले.

कुस्ती क्षेत्रात आपल्या मावळ तालुक्याचे नाव लौकिक करणाऱ्या पैलवानांना स्व.पै. केशवराव ढोरे पुरस्कार देऊन विशेष सत्कार करुन या पैलवानांना सन्मानित करण्यात आले. खंडू वाळुंज, भरत लिम्हण, विशाल भोईर, खंडू कालेकर, विकास येनपुरे, संदीप काळे, अमोल राक्षे, नागेश राक्षे, तुषार येवले, प्रतीक देशमुख, अजित करवंदे, विपुल आडकर, सावरी सातकर, सनम शेख

दगडी गोटीवर सर्वात जास्त बैठका मारणाऱ्या वरिष्ठ गटातील विजेत्यांना अरुण वाघमारे, सुनील दंडेल व अतुल ढोरे यांच्यावतीने तर कुमार गटातील विजेत्यांना विकी म्हाळसकर, अशोक घुले व सागर बरदाडे यांच्या वतीने चषक देण्यात आले.

**वरिष्ठ गट** - सौरभ ढोरे २८५ बैठका, किशोर धोत्रे २१२ बैठका, तेजेस भिलारे ६६ बैठका, नितीन म्हाळसकर ३५ बैठाक, (मध्य गोटी), अभिजित दिसले ३५बैठका, चिराग वाघवले २६बैठका (मोठी गोटी)

**कुमार गट** - विराज वाघवले ११८ बैठका, हर्ष चव्हाण ८० बैठका, यशराज चव्हाण ८० बैठका, आर्यन ढोरे ५१बैठका, देवेश पाटील ३३ बैठका, गणेश तुमकर २१ बैठका, विनित वहीले १८ बैठका, प्रथमेश नवघने १७बैठका, साकक्षी म्हाळसकर २८ बैठकि, मयुरी लोळे ७ बैठका.

कार्यक्रमाचे आयोजन जय बजरंग तालीम मंडळ ट्रस्ट व शिवजयंती उत्सव समितीचे यांच्या वतीने करण्यात आले होते.

# पुणे लोकसभा मतदारसंघात 'वंचित'च्या उमेदवाराबाबत उत्सुकता

**राजदंड न्यूज नेटवर्क / पुणे**

भाजप आणि काँग्रेसने उमेदवार जाहीर केल्यानंतर आता वंचित बहुजन आघाडीच्या पुणे लोकसभा मतदारसंघात उमेदवार कोण असणार? याची उत्सुकता लागली आहे.

पुण्यात वंचितची सभा झाली. त्यावेळी पुण्याचा खासदार ॲड. प्रकाश आंबेडकर अशाप्रकारचे फ्लेक्स झळकले होते. त्यामुळे स्वतः आंबेडकर उमेदवार असतील की, कोणाला संधी मिळणार, याची उत्सुकता लागली आहे. महाविकास आघाडीच्या जागावाटपात वंचितला समाधानकारक वाटा मिळाला नाही. त्यामुळे त्यांनी स्वबळावर लढण्याची तयारी सुरू केली आहे. याचा तोटा महाविकास आघाडीला होणार असल्याचे बोलले जात आहे. तर, भाजपला फायदा होणार असल्याची कुजबुज सुरू आहे. पुण्यात झालेल्या वंचितच्या सभेला तुफान गर्दी झाली होती. या पक्षाचे कार्यकर्ते तळागाळात असल्याने आंबेडकर यांनी लोकसभा निवडणूक अत्यंत प्रतिष्ठेची केली आहे.

पुण्यात भाजपचे उमेदवार मुरलीधर मोहोळ, काँग्रेसचे आमदार रवींद्र धंगेकर यांनी प्रचाराला सुरुवात केली आहे. वंचितचाही उमेदवार लवकरच जाहीर करणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली. अपक्ष उमेदवार म्हणून आपण निवडणूक लढविणार असल्याचे मनसेचे महापालिकेतील माजी गटनेते वसंतराव मोरे यांनी जाहीर केले आहे. पुणे लोकसभा मतदारसंघात सध्या तरी उमेदवारांनी गाठीभेटीवर भर दिला आहे. आपापल्या पक्षाचा अजेंडा समोर ठेवला आहे.

# ...तर फक्त दीड वर्षात औंधसह २० गावांना पाणी मिळू शकते!

- **जनतेच्या भल्यासाठी राजकारण बाजूला ठेवून लोकप्रतिनिधींना सहकार्य करणार !**
- **माजी आयुक्त प्रभाकर देशमुखांचं आ. जयकुमार गोरेंना सहकार्य करण्यासाठी एक पाऊल पुढं!**

**राजदंड / वडूज**

औंधसह वीस गावांचा पाणी प्रश्न सुटण्यासाठी तीन वर्षे वाट बघण्याची गरज नसून इच्छाशक्ती असेल तर दीड वर्षातच या गावांना पाणी मिळू शकते. जनतेच्या भल्यासाठी राजकारण बाजूला ठेवून या कामात सहकार्य करण्यास आम्ही तयार आहोत असं प्रतिपादन राष्ट्रवादीचे नेते प्रभाकर देशमुख यांनी केले.

आमदार जयकुमार गोरे यांनी औंधसह वीस गावांना तीन वर्षात पाणी देणार असं औंध येथील ''पाणी पे चर्चा'' या मेळाव्यात सांगितलं होतं. त्या अनुषंगाने आयोजित पत्रकार परिषदेत प्रभाकर देशमुख बोलत होते.

प्रभाकर देशमुख म्हणाले, औंधसह वीस गावांचा पाणी प्रश्न हा तेथील जनतेच्या जीवनमरणाचा अन आमच्या जिव्हाळ्याचा विषय आहे. त्यासाठी येथील जनतेने मोठा संघर्ष केला आहे. त्यामुळे यात आम्हाला राजकारण आणायचे नाही. पण पाणी लवादाचे कारण पुढे करुन लोकप्रतिनिधींकडून आपले अपयश झाकण्याचा केविलवाणा प्रयत्न सुरु आहे. १९७६ साली पाणी



लवादाच्या निर्णयानुसार कृष्णा खोऱ्यातील ५९४ टीएमसी पाणी महाराष्ट्राच्या वाट्याला आले. त्यानंतर २०१२ साली पाणी लवादाचे पुन्हा फेरवाटप करण्यात आले. त्याला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिल्याने त्याची प्रत्यक्षात अंमलबजावणी झाली नाही. त्यामुळे १९७६ ची पाणी लवादाची परिस्थिती आजही तशीच आहे. महाराष्ट्राच्या वाट्याच्या पिण्यासाठी, शेती व औद्योगिक कारणासाठी आलेल्या पाण्याचे अंतर्गत फेरवाटप करण्याचे अधिकार राज्य शासनाला आहेत. त्यानुसार औंधसह सोळा गावांना १.२५ टीएमसी पाणी देण्याचा निर्णय महाविकास आघाडी सरकार व तत्कालीन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या कार्यकाळात झाला आहे.

हा शासन निर्णय ७ जानेवारी २२ रोजी झाला असून त्यात स्पष्ट नमूद केले आहे

**३० सप्टेंबर २०२३ रोजी फेरमान्यता दिली त्या शासन निर्णयात सातारा जिल्ह्यातील खटाव तालुक्यातील औंधसह सोळा गावांना सिंचनासाठी कृष्णा प्रकल्पातील कण्हेर जलाशयातून पाणी आरक्षित होणेसाठी कृष्णा प्रकल्पाच्या सुधारीत जलनियोजनास शासन निर्णय ७ जानेवारी २०२२ अन्वये मान्यता देण्यात आली आहे असे स्पष्ट नमूद केले आहे.पत्रकार परिषदेस डॉ महेश माने, येरळ वाडी सरपंच योगेश जाधव, कार्यकारी नगरसेवक वायदंडे बापू, गोडसे आदी उपस्थित होते.**

लवादाप्रमाणे महाराष्ट्राला दिलेल्या पाण्यापैकी पिण्याच्या पाण्याचे १.२५ टीएमसी पाणी कमी करून औंध योजनेसाठी पाणी आरक्षित करण्याचा निर्णय झाला आहे. त्याचवेळी या गावांना पाणी देण्याबाबतचा सर्व्हे सुरु करण्यात आला. त्यामुळे लवादाचे कारण पुढे करुन पाणी देता आले नाही असं म्हणणं योग्य नाही. २००९ पासून लोकप्रतिनिधी पाणी आरक्षित करु शकले नाहीत हे त्यांचं अपयश आहे.

औंधसह वीस गावांना पाणी देण्याची अत्यंत आवश्यकता आहे. लोकप्रतिनिधींनी वीस गावांना पाणी देण्याचे मान्य केले आहे. यासाठी प्रशासकीय मान्यता आणि ५७६ कोटी निधी उपलब्ध करुन देवू असे सांगितले आहे. लोकप्रतिनिधींनी खोटा कळवळा न दाखवता इच्छाशक्तीने हा संपुर्ण निधी प्राधान्याने राज्य शासनाकडून उपलब्ध करुन घेतला तर तज्ञांच्या म्हणण्यानुसार दीड वर्षात ही योजना पुर्ण होवू शकते. त्यासाठी यात कोणतेही राजकारण वा आडकाठी न आणता आमचे संपुर्ण सहकार्य राहील.

# बालवडी येथे मृतदेहाची विटंबना...

- अर्धवट जळालेला मृतदेह सरणावरून ढकलला...
- भोर तालुक्यातील घटना
- पोलिसात गुन्हा दाखल, एकास अटक

**राजदंड / भोर**

स्मशानभूमीच्या जमिनीवरील वादातून वयोवृद्ध महिलेच्या अंत्यविधीचा कार्यक्रम झाल्यावर अग्नीतील अर्धवट जळलेला मृत्यूदेह सळईच्या साह्याने बाहेर काढून मृतदेहाची हेळसांड,विटंबना करत माणुसकीला काळीबा फासणारी घटना बालवाडी (ता.भोर) येथील स्मशानभूमीवर रविवार (दि.२४) रोजी सायंकाळी घडली. याबाबत आरोपी प्रकाश सदुभाऊ बढे (रा.नेरे ता.भोर ) याला गावातील तरुणांनी चोप देऊन भोर पोलिसांच्या ताब्यात दिले. पोलीसांनी त्याच्यावर गुन्हा दाखल केला आहे.



याबाबत मिळालेले माहिती फिर्यादी अक्षय विजय किंद्रे (वय ३० वर्ष रा. बालवडी ता.भोर) यांच्या आजी ताराबाई आनंदा किंद्रे यांचे राहत्या घरी निधन झाले होते. सायंकाळी सहा वाजता गावच्या स्मशानभूमीवर बालवडी ग्रामस्थांनी मृत्यू देहावर अंत्यसंस्कार करून पुन्हा घरी परतले. स्मशानभूमी जवळ राहणारे नेरे गावातील रहिवासी प्रकाश बढे हे अंत्यविधी जळत असलेल्या प्रेताजवळ जाऊन लोखंडी सळईच्या साह्याने अर्धवट जळलेला मृतदेह बाहेर काढून ओढ्याजवळ फेकून दिला. व त्याचे हेळसांड करून विटंबना केली. हे कृत्य रस्त्यावरून जात असलेल्या नागरिकांनी पाहिले.संबंधित नातेवाई कांना कळवून माहिती देण्यातआली. घटनेच्या ठिकाणी गावातील तरुण, ग्रामस्थ जमून आरोपी प्रकाश बढे याला चांगला चोप दिला. यामध्ये बढे गंभीर जखमी झाले असून भोर पोलिसांनी त्यांना ताब्यात घेऊन उपचारासाठी उपजिल्हा रुग्णालयात पाठवण्यात आले. त्यावर मानवी शवाची अप्रतिष्ठा करून व्यत्यय आणून अपमान करून विटंबना केला असल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला .त्यावेळी जमावाकडून बढे यांच्या शेडची मोडतोड करून हॉटेल जाळण्यात आले. त्यावेळी भोर नगरपरिषदेच्या अग्निशामक बंबाच्या साह्याने आग आटोक्यात आणण्यात आली.दरम्यान अर्धवट जळालेल्या मृतदेहाची विटंबना झाली असताना त्याच्यावर अंत्यसंस्कार करण्यासाठी ग्रामस्थांनी विरोध करून जमाव केला होता. घटनास्थळी पोलीस निरीक्षक अण्णा पवार सहायक पोलीस निरीक्षक, दीप्ती करपे , अनिल चव्हाण , पोलीस हवालदार विकास लगस , उद्धव गायकवाड , केतन खांडे , हेमंत भिलारे जाऊन ग्रामस्थांची समजूत काढून अर्धवट जळलेल्या मृतदेहाला अग्नि दिला.

बालवडी स्मशानभूमीजवळ प्रकाश बढे यांची शेती, हॉटेल, शेड असल्यामुळे या स्मशानभूमीचा त्रास होईल या हेतूने बढे यांनी हे कृत्य केले आहे.

## गद्दार आढळराव पाटलांना शिरूरचे मतदार निवडून देणार नाहीत : प्रशांत जगताप

**राजदंड न्यूज नेटवर्क / पुणे**

गद्दार आढळराव पाटलांना शिरूर लोकसभा मतदारसंघातून मतदार निवडून देणार नाहीत. तर कर्तृत्वान डॉक्टर अमोल कोल्हे पुन्हा खासदार होणार, असा विश्वास राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांनी व्यक्त केला.

होय तेच शिवाजीराव आढळराव पाटील ज्यांनी अजितदादा पवार, दिलीप वळसे पाटील व राष्ट्रवादीच्या नेत्यांवर अतिशय खालच्या पातळीवर टीका केली, राष्ट्रवादी संपवण्याची भाषा केली. त्यांचे अनेक व्हिडिओ सोशल मीडियामध्ये उपलब्ध आहेत. त्यांनाच राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश देण्याची नामुष्की अजितदादा पवार यांच्यावर आली, मतदार संघात राष्ट्रवादी काँग्रेस सक्षम असती तर आयात उमेदवार घेण्याची वेळच आली नसती, अशा शब्दात प्रशांत जगताप यांनी टीका केली.

शिवाजीराव आढळराव पाटील यांचा आज अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश होत आहे. या पार्श्वभूमीवर प्रशांत जगताप यांनी आढळराव पाटलांसह अजित पवारांना देखील चिमटे काढले आहेत.

## सुप्रीम कोर्टाचा प्रभाग रचना करू नका असा आदेश नाही

### माजी नगरसेवकांचे निवेदन

**राजदंड न्यूज नेटवर्क / पुणे**

सुप्रीम कोर्टाचा प्रभाग रचना करू नका अशा प्रकारचा आदेश नाही. लोकशाहीच्या व्यापक हिताच्या दृष्टीने लोकप्रतिनिधी जसे लोकसभेमध्ये असतात, तसेच ते विधिमंडळ आणि महानगरपालिका नगरपालिका जिल्हा परिषद इथेही असणं आवश्यक आहे. त्या दृष्टिकोनातून कायद्याने आपल्यावर टाकलेली जबाबदारी आपण त्वरित पूर्ण करण्याच्या संदर्भातल्या सर्व सूचना सर्व संबंधितांना त्वरित द्याव्यात, यामध्ये कुठेही लोकसभेच्या आचारसंहितेचा भंग होत नाही, असे पुणे महापालिकेचे माजी नगरसेवक उज्वल केसकर, सुहास कुलकर्णी, प्रशांत बधे यांनी म्हटले आहे. त्यासंदर्भातील निवेदन आज आयुक्त राज्य निवडणूक आयोग महाराष्ट्र राज्य यांना देण्यात आले आहे.

महाराष्ट्र शासनाच्या मंत्रिमंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार कायद्यामध्ये बदल करून नवीन प्रभाग रचना तयार करण्यासंबंधी नवीन कायदा केला आहे. त्यात बहु सदस्य प्रभाग रचना असणे आवश्यक असून तीन (३) पेक्षा कमी नाही आणि चार (४) पेक्षा जास्त नाही, अशा प्रकारची प्रभाग रचना तयार करणे आवश्यक आहे.

गेली दोन वर्ष कुठल्याही महानगरपालिकेमध्ये नगरपालिकेमध्ये लोकप्रतिनिधी नाही.

मेहरबान सुप्रीम कोर्टाने दिलेल्या आमच्या याचिकेवरच्या निर्णयानुसार जुन्या प्रभाग रचनेवर निवडणूक घेणे संबंधित सुस्पष्ट आदेश होते. परंतु, तत्कालीन महाविकास आघाडी सरकारच्या दबावामुळे राज्य निवडणूक आयोगातील काही अधिकाऱ्यांच्या विहित स्वार्थामुळे ती निवडणूक होऊ शकली नाही.

लोकसभेची निवडणूक संपल्यानंतर महानगरपालिकेची निवडणूक घ्यायची असेल तर आत्तापासून प्रभाग रचना तयार करणे आवश्यक आहे.

७३ व्या आणि ७४ व्या घटना दुरुस्ती नंतर आयोगाची आणि आयोगाच्या आयुक्त म्हणून आपली निपक्षपाती अधिकारी म्हणून निवड झाली आहे.

अशा परिस्थितीत तातडीने प्रभाग रचना तयार करण्यासंबंधीच्या मार्गदर्शक सूचना तातडीने सर्व महानगरपालिका नगरपालिका यांना द्याव्यात.

गरज पडली तर आमच्या मतानुसार मेहरबान सुप्रीम कोर्टाच्या निर्दशनास आणून प्रभाग रचना अंतिम करता येईल. या विषयावर चर्चा करण्यासाठी आम्हाला वेळ कळवावी, असेही या नगरसेवकांनी निवेदनात म्हटले आहे.

## सामाजिक कार्यकर्ते अजित वाकनीस यांचे निधन

**राजदंड / सातारा**



सातारा येथील सामाजिक कार्यकर्ते अजित वाकनिस (६८) यांचे पुणे येथील कमांडो हॉस्पिटल येथे उपचार सुरू असताना निधन झाले.

त्यांचे पार्थिवावर संगम माहुली येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांचे मागे पत्नी, एडवोकेट ओंकार व कर्नल ऋषिकेश ही दोन मुले व सुना, नातवंडे असा परिवार आहे.

१८५७ च्या स्वातंत्र्य समर मध्ये अजित वाकनीस यांचे पूर्वज विठ्ठल कोंडीबा वाकनीस यांना देहदंडाची शिक्षा ठोठावण्यात आली होती. सातारा येथील फाशीचा वड येथे हुतात्म्यांचे चांगले स्मारक उभारले जावे त्यासाठी अजित वाकनीस विशेष प्रयत्न करत होते.

## भोर तालुक्यातील आश्रमशाळा पटसंख्येअभावी बंद होणार

**राजदंड / भोर**

भोर तालुक्यातील डोंगराळ व दुर्गम भागातील मुलांना शिक्षण मिळावे व त्यांचे जीवनमान उंचवावे यासाठी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पच्या माध्यमातून कुरुंजी या गावात १९७२साली तर पांगारी गावात १९७३ साली आश्रमशाळा सुरू केल्या.अनेक मुलांनी या शाळेत शिक्षण घेऊन प्रगती केली आहे. दोन्ही शाळेत इयत्ता पहिली ते दहावपर्यंत विद्यार्थी शिक्षण घेत आहेत मात्र इयत्ता पहिली ते चौथीच्या वर्गातील पटसंख्या कमी असल्याने हे चारही वर्ग बंद करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.तर ५ वी ते १० वी पर्यंत चे वर्ग सुरू राहणार आहेत. कुरुंजी गावात शिक्षण घेण्यासाठी जिल्हा परिषद शाळेची सोय नाही.आश्रमशाळेतील हे चार वर्ग बंद पडल्यास शिक्षण घेण्यासाठी लांब पल्ल्याच्या अंतरावर जावे लागणार आहे. परंतु एवढ्या अंतरावर जाणे शक्य नसल्याने येथील मुले शिक्षणापासून वंचित राहण्याची शक्यता आहे.

### अनेक विद्यार्थी शिक्षणापासून राहणार वंचित

कुरुंजी आश्रम शाळेतील इयत्ता पहिली ते चौथीचे वर्ग बंद पडल्यास या गावात जिल्हा परिषद मार्फत शिक्षण घेण्याची सोय नाही. यासाठी मुलांना मळे गावात जावे लागणार आहे परंतु करंजी पासून मळे चार किलोमीटर अंतरावर आहे. येथील पालक वर्गाला कुटुंबाचा उदरनिर्वाह भागवण्यासाठी मोल मजुरी करावी लागत आहे. यामुळे मुलांना दररोज शाळेपर्यंत ने आण करणे शक्य नसल्याने या गावातील मुले शिक्षणापासून वंचित राहण्याची शक्यता आहे.

पांगारी गावात चौथीपर्यंत शिक्षण घेण्याची सोय असली तरी शाळेपर्यंत जाण्यासाठी पायवाटेने एक किलोमीटर पायी जावे लागत आहे. या पायवाटे लगत हिंस्र वन्य प्राण्यांचा वावर होत असल्याने या ठिकाणी भीतीचे वातावरण आहे. तसेच पावसाळ्यातही लहान मुलांना एवढे अंतर कापणे त्रासदायक आहे. या गावात लोकवस्ती पासून आश्रमशाळा जवळच असल्याने या शाळेतील चौथीपर्यंतचे वर्ग सुरू राहिल्यास शिक्षण घेण्यासाठी मुलांना सोयीस्कर होईल.

## ग्राम सुरक्षा यंत्रणेच्या प्रभावी वापरामुळे 'फॉरेस्ट'ला लागलेली आग विझविली

### वर्धनगड ग्रामस्थांना व वन विभागाला यश

**राजदंड / वर्धनगड**

वर्धनगड, ता. खटाव, जि. सातारा गावातील फॉरेस्टला रात्री २ वाजता आग लागली. हे लक्षात येताच सदर घटनेचे गांभीर्य लक्षात घेत गावचे पोलीस पाटील गणेश जठार यांनी ग्राम सुरक्षा यंत्रणेच्या हेल्पलाइन (१८००२७०३६००) नंबरवरून तात्काळ ही माहिती संपूर्ण गावाला दिली. काही तरुण या यंत्रणेने जागे झाले. ग्रामपंचायत कर्मचारी चांगदेव जाधव यांनी मंदिराच्या ध्वनिक्षेपकावरून वारंवार अलाउन्स केले. यावेळी येथील माजी उपसरपंच व सामाजिक कार्यकर्ते अर्जुन कुंभार, सादिक शिकलगा आणि काही वेळातच तेथे गावातील तरुण मदतीसाठी धावले व त्याचबरोबर वन विभागाचे अधिकारी तांबोळी व त्यांचे सहकारी अर्ध्या तासाच्या आत वर्धनगड येथे पोहोच झाले. फॉरेस्टला लागलेली आग ग्रामस्थांच्या व वन विभागाच्या मदतीने दोन तासाच्या अथक परिश्रमानंतर विझवण्यात आली.



ग्राम सुरक्षा यंत्रणेच्या तात्काळ व प्रभावी वापरामुळे मोठा अनर्थ टळला; परंतु या डोंगरावरती या आठवड्यामध्ये दोन वेळा आग लागली आहे. ही आग लागत आहे की लावली जात आहे. हा संशोधनाचा विषय असून, यावर वनविभागाने पाळत ठेवण्याची गरज आहे. सध्या दुष्काळाची भीषण परिस्थिती निर्माण झाली असून, या वनव्यामुळे वन धोक्यात येत आहेत, तसेच या डोंगर जंगलामध्ये वन्य प्राण्यांची संख्या ही मोठ्या प्रमाणात होऊ लागली आहे. डोंगराच्या पायथ्यालगत तलाव असल्यामुळे हे प्राणी या तलावावर पाणी पिण्यासाठी येत असतात, अशा लावलेल्या वनव्यामुळे वन्य प्राण्यांच्या जीवितालाही धोका निर्माण झाला आहे. सदर याबाबत वन विभागाने ठोस पावले उचलण्याची गरज असल्याची चर्चा आता ग्रामस्थांमध्ये बोलली जात आहे.

## वसुलीचे भोंगे तात्काळ बंद करा - प्रताप जाधव

**राजदंड / वर्धनगड**



संपूर्ण महाराष्ट्रात दुष्काळजन्य परिस्थिती असताना पाणीटंचाई व शेतकरी पूर्ण उध्वस्त झाला असून, या हंगामातील सर्व पिके हाताला लागली नाहीत, शेतीमालाला नसलेला दर व निसर्गाच्या अवकृपेने शेतकरी पूर्ण बुडाला आहे. कोरेगाव विधानसभा मतदारसंघात कुमठे, सातारारोड, किनी, शिरंबे, पुसेगाव, बुध, खटाव अशी मंडले दुष्काळग्रस्त शासनाने जाहीर केली असून त्याचा जीआर ही संबंधित विभागांना प्राप्त झाला आहे. या जीआरमध्ये सहकारी कर्जाचे पुनर्गठन करणे, शेतीस निगडित कर्ज वसुली स्थगित करणे व शेतीपंपाची लाईट कट न करणे, असे उल्लेख केलेला आहे. किंवा नियमावली आहे परंतु या नियमाला तिलांजली देत संबंधित विभागाचे अधिकारी राजरोसपणे वसुलीचा तगादा गोरगरीब शेतकऱ्यांना लावत आहेत.

खाजगी फायनान्स यांना तर कोणत्याच प्रकारचा आळा नाही गोरगरीब मजूरवर्ग,शेतकऱ्यांच्या घरी जाऊन दमदाटी करणे व जबरदस्तीने वसुली करणे असा सर्रास प्रकार या दुष्काळी मंडळात होत आहे. वसुली पथकाच्या गाड्या गुंडशाही पद्धतीने वसुलीचा तगादा शेतकऱ्यांच्या मागे लावत आहेत.या सर्व विषयावर शिवसेना आक्रमक असून, येणाऱ्या काळात शिवसेना रस्त्यावर उतरणार आहे. दुष्काळी मंडले जाहीर करून सुद्धा प्रशासन याकडे दुर्लक्ष करत असेल, तर शिवसेना कोणतीही भिड न बाळगता वसुली पथकाच्या गाड्या अडवन्यात येतील असे आव्हान शिवसेनेच्या वतीने प्रताप जाधव यांनी केले आहे.

## काटवलीतील ग्रामस्थांकडून अनोखी 'धुळवड'

### पाणवठे व जलस्त्रोत परिसर केले स्वच्छ

**राजदंड / वाई**

जावली तालुक्यातील काटवली गावच्या ग्रामस्थांनी धुलीवंदनाला पाणवठे व जलस्त्रोत परिसर स्वच्छ करून अनोख्या पद्धतीने धुळवड साजरी केली.

काटवली गावाला पिण्याचे पाणी हे पाचगणी डोंगरातून झऱ्यांचे पाणी एकत्र करून उताराने गावाला पुरवले आहे. परंतु हे झरे उन्हाळ्यात कमी झाल्याने पाण्याचा तुटवडा वाढतो. त्यामुळे गावातील युवकांनी एकत्र येत आज धुलीवंदनाचे औचित्य साधून हे झरे, टाक्या व परिसर स्वच्छ करून अनोखी धुळवड साजरी करण्याचे ठरवले.

युवकांनी झऱ्यांच्या परिसरातील सर्व झुडपे, जाळ्या काढून हा परिसर स्वच्छ केला. याबरोबरच पाण्याची टाकी सुद्धा स्वच्छ केली. गावात विविध उपक्रम तसेच सामाजिक उपक्रमांतून प्रबोधन करून सकारात्मक बदल युवकाच्याकडून करण्यात आले आहेत. गाव गेल्या अनेक वर्षापासून तंटामुक्त आहे. सर्व ग्रामस्थांनी धुलीवंदन तथा धुळवडीचा सण पाणवठे व झरे स्वच्छतेच्या माध्यमातून साजरा करण्याचा संकल्प केला. आणि तसे नियोजन करून हे काम पूर्ण केले. या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.



**संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान, तंटामुक्त अभियान, हागणदारीमुक्त गावासह 'स्वच्छ व सुंदर गाव' स्पर्धेचे बक्षीस गावाने पटकावले आहे. सध्या पाणी नियोजनात पाचगणी येथील 'ग्रामपरी' या संस्थेने गाव दत्तक घेतले असून यामधून पाण्याचे झरे स्वच्छ केले जात आहेत. ही सर्व कामे लोकसहभागामुळेच शक्य झाली आहेत.**

**- सरपंच सौ. मीनाक्षी बेलोशे**

## सामुदायिक विवाह सोहळे काळाची गरज - अजय भवार

**राजदंड / वडगाव मावळ**

मावळातच नव्हे तर महाराष्ट्र भर सामुदायिक मंगल परिणय सोहळे होणे ही काळाची गरज आहे. आज काल लोकं लग्नासाठी लाखो रुपयांची उधळण करतात, एकमेकांच्या चढाओढीने लग्न समारंभ पार पाडण्यासाठी पैसे कमी पडले तर जमिनी विकून लग्न करतात आणि याच कारणामुळे काही शेतकरी भूमिहीन झाल्याचे आपणास पाहवयास मिळत आहे. या सर्व बाबींना कुठेतरी आळा बसावा यासाठी जनहित चॅरिटेबल ट्रस्टच्या माध्यमातून हा सोहळा घेण्यात येत असल्याचे प्रतिपादन जनहित चॅरिटेबल ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष अजय भवार यांनी पत्रकार परिषदेत नमूद केले.

दरम्यान, सामुदायिक मंगल परिणय सोहळा नियोजन समिती देखील जाहीर करण्यात आली. नवनिर्वाचित समिती पुढीलप्रमाणे -

अध्यक्ष - निलेश गोकुळ शिंदे, वराळे, कार्याध्यक्ष - रुपेश उर्फ बंटी गायकवाड, कामशेत, उपाध्यक्ष - संदीप नामदेव ओव्हाळ, नायगाव, कार्याध्यक्ष - प्रदीप ओव्हाळ, कान्हे, महासचिव - रवी गंगाराम भवार, बौर, सहसचिव - शशिकांत गायकवाड, साते, खजिनदार - भावेश थोरात, मुंढावरे, सहखजिनदार - सिद्धार्थ भालेराव, वडगाव, संपर्क प्रमुख - विकास शिंदे, माळेगाव, सहसपर्क प्रमुख - महेश थोरात, वेल्हवली, प्रसिद्धी प्रमुख - सचिन शिंदे, अजिवली व प्रफुल ओव्हाळ, शिळीम, कायदेशीर सल्लागार - ॲड. योगेश गायकवाड, ॲड. मयूर शिंदे, ॲड. अमोल देसाई.



अजय भवार

विभागीय उपाध्यक्ष - पवन मावळ - प्रा. राहुल सोनवणे, कोथुर्णे, नाणे मावळ - संदीप बबन जाधव, वळक, आंदर मावळ - बाजीराव ओव्हाळ, लोणावळा शहर, कामशेत शहर - महेंद्र वंजारी, कामशेत, वडगाव शहर - नितीन आल्हाट, वडगाव, तळेगाव शहर - आनंद बबन घोडके, तळेगाव, देहूरोड शहर - अमोल नाईकनवरे, देहूरोड, सोशल मीडिया प्रमुख - समाधान सोनवणे,साते, रुपाली क्षीरसागर, लोणावळा, वधू नियोजन प्रमुख - सारिका सोनवणे, कामशेत.

वधू नियोजन समिती - अनिता गायकवाड, माया वंजारी, कामशेत, संघटक - प्रवीण सरोदे, विपुल जाधव,सचिन साळवे,विशाल वाघमारे, किरण ओव्हाळ, सचिन ओव्हाळ, तुकाराम डोळस, संदीप चौरे, कुणाल घोडके, गणेश गायकवाड, चंद्रकांत थोरात.

याप्रसंगी सोहळा समितीचे नवनिर्वाचित अध्यक्ष निलेश शिंदे म्हणाले की, आगामी सामुदायिक मंगल परिणय सोहळा भव्य प्रमाणात यशस्वी होण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येईल त्यासाठी समाजाच्या सर्व स्तरातील लोकांपर्यंत पोहोचण्यासाठी प्रचार प्रसार जनसंपर्क अभियान राबविण्यात येईल.

यावेळी जनहित चॅरिटेबल ट्रस्टचे विश्वस्त संजय गायकवाड, प्रभाकर वाघमारे, आनंद वंजारी, दलितानंद थोरात, सचिन भवार, संदीप ओव्हाळ, ज्योती शिंदे आदी उपस्थित होते.

जनहित चॅरिटेबल ट्रस्टने निवड केलेल्या या समितीवर समाजाच्या विविध सर्वच क्षेत्रातील मंडळी सामावून घेण्यात आल्याने सामाजिक एकसंघतेचे चित्र निर्माण झाले असून त्यामुळे समाजामध्ये एक उत्साह निर्माण झाल्याचे भावना आंबेडकरी समाजामध्ये व्यक्त होत आहे.

विवाहनिश्चित झालेल्या वधू-वरांनी सामुदायिक मंगल परिणयसोहळा नावनोंदणीसाठी पालकांसह संपर्क साधावा तसेच हा भव्य सोहळा सामूहिक अर्थसंकलनातून संपन्न होत असल्याने इच्छुक दानशूर देणगीदारांनीही ट्रस्टकडे संपर्क साधावा असे आवाहन यावेळेस पत्रकार परिषदेच्या माध्यमातून करण्यात आले.

प्रास्ताविक व सूत्रसंचालन ट्रस्टचे महासचिव पत्रकार सचिन कांबळे यांनी केले तर उपस्थितांचे आभार ट्रस्टचे कोषाध्यक्ष प्रवीण भवार यांनी मानले.

## भगिनी निवेदिता सहकारी बँकेने सहकार क्षेत्राचे नेतृत्व केले पाहिजे : विद्याधर अनास्कार

**राजदंड / पुणे**

सहकार क्षेत्राला आणखी सक्षम करण्यासाठी भगिनी निवेदिता सहकारी बँकेने सहकार क्षेत्राचे नेतृत्व केले पाहिजे. सर्व सहकारी बँका, संस्था आपल्या मार्गदर्शनाने सहकार क्षेत्रात भरारी घेतील, असे प्रतिपादन करण्यासाठी सहकार व बँकिंग क्षेत्रातील ज्येष्ठ तज्ज्ञ अभ्यासक विद्याधर अनास्कार यांनी केले. भगिनी निवेदिता बँकेने खातेदारांचा विश्वासाचा ठेवा मिळवला आहे. महिलांचे सक्षमीकरण करण्यात बँकेने यश मिळवले असून पुढील अमृत महोत्सवी वाटचालीसाठी शुभेच्छा यावेळी त्यांनी दिल्या.




भगिनी निवेदिता सहकारी बँकेचा सुवर्ण महोत्सव सांगता समारंभ रविवारी टिळक स्मारक मंदिरात मोठ्या उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सहकार व बँकिंग क्षेत्रातील ज्येष्ठ तज्ज्ञ अभ्यासक विद्याधर अनास्कार यांनी भूषविले. तर प्रमुख पाहुणे म्हणून मसापचे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी यावेळी उपस्थित होते. बँकेच्या अध्यक्षा सीए डॉ. रेवती पैठणकर, उपाध्यक्षा सीएमए डॉ. नेत्रा आपटे, मुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता देशपांडे यावेळी उपस्थित होत्या. याप्रसंगी भगिनी निवेदिता सहकारी बँकेच्या सुवर्ण भरारी स्मरणिकेच्या इंग्रजी अनुवादाचे प्रकाशन व बँकेच्या इंटरनेट बँकिंग सुविधेचा शुभारंभ मान्यवरांच्या हस्ते यावेळी पार पडला. यावेळी बँकेचे संचालक व व्यवस्थापन मंडळ व सेवक वर्ग, बँकेचे सभासद, खातेदार यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बँकेच्या अध्यक्षा सीए डॉ. रेवती पैठणकर यांनी प्रास्ताविक केले. यावेळी त्यांनी बँकेच्या वर्षभरातील कार्याचा आढावा घेतला. ग्राहकांच्या संवादाबरोबर ठेवी व आकर्षक योजना उपलब्ध करून देण्यात आले आहेत. ५० वर्षे पूर्ण झाली असून ग्राहकांच्या सेवेसाठी उपलब्ध आहेत. बँकेची विश्वासाची परंपरा आहे. बँकेने काळानुरूप ग्राहकांना अत्याधुनिक सोयीसुविधा दिल्या आहेत. शिक्षण कर्ज योजनासह विविध योजना सादर केल्या आहेत.

अनास्कार म्हणाले, सहकार संस्था व बँकांना राज्य सरकारने मदत केली पाहिजे. राजकारणापासून भगिनी निवेदिता बँक अलिप्त राहून सहकार क्षेत्रात विकास केला आहे. महिलांनी महिलांच्या सक्षमीकरणासाठी ही बँक चालवली आहे, हे कौतुकास्पद आहे.

प्रा. मिलिंद जोशी म्हणाले, भगिनी निवेदिता बँकेची ग्राहकांशी महत्वाची भावना आहे. सहकार क्षेत्रात आपला ठसा उमटवून महिलांना सहकार क्षेत्रात संधी उपलब्ध करून दिली आहे. भगिनी निवेदिता यांचे सामाजिक कार्य व त्यांचे विचारांशी आपण एकरूप आहे. ही एकरूपता आपण टिकवून ठेवली आहे. भगिनी निवेदिताने सहकार क्षेत्रात महिलांना संधी दिली आहे. आज काळ झपाट्याने बदलत आहे काळानुसार बँकेने बदल करून ग्राहकांचा विश्वास मिळवला आहे.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन मुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता देशपांडे यांनी केले. तर उपाध्यक्षा सीएमए डॉ. नेत्रा आपटे यांनी आभार मानले. कार्यक्रमानंतर राष्ट्रीय पुरस्कार विजेती व प्रसिद्ध गायिका सावनी रविंद्र यांचा 'हिंदी-मराठी' गीतांचा कार्यक्रम झाला. कार्यकामला उत्स्फुर्त दाद यावेळी दिली.

# लडाखचा धडा

**राजकीय पक्षाने दिलेली आश्वासने पूर्ण केली नाही, की लोक रस्त्यावर येतात. आश्वासने देताना ती पूर्ण करता येतील, की नाही, याचा विचार केला जात नाही. समुद्र नसेल, तर समुद्र आणू, चंद्र, तारे, सूर्य आणू, नद्या देऊ अशी वारेमाप आणि प्रत्यक्षात न येणारी आश्वासने राजकीय पक्ष देतात आणि जेव्हा ती पूर्ण करायची वेळ येते, तेव्हा राजकीय पक्ष हात आखडता घेतात. आश्वासने किरकोळ असली, तर ती पूर्ण करावीत अशी त्यांची अपेक्षा गैर नसते.**

लडाखमध्ये गेल्या तीन आठवड्यांपासून पर्यावरणवादी कार्यकर्ते सोनम वांगचूक उणे तापमानात उपोषणाला बसले आहेत. निवडणूक आचारसंहितेच्या अगोदर त्यांचे उपोषण सुरू झाले आहे. लडाख, लेह आणि कारगिल या जिल्ह्यांमध्ये लोक रस्त्यावर उतरले आहेत. लडाखला घटनेच्या सहाव्या अनुसूचीमध्ये समाविष्ट करून राज्याचा दर्जा द्यावा यासह विविध मागण्यांसाठी स्थानिक लोक उपोषण आणि निदर्शने करत आहेत. लडाखची संस्कृती आणि पर्यावरण वाचवण्यासाठी या लढ्यात लोकशाहीच्या पुनर्स्थापनेचा मुद्दाही सामील आहे. 'लडाख वाचवा, हिमालय वाचवा, ग्लेशियर वाचवा' अशी ही चळवळ सुरू आहे. वांगचूक यांनी या उपवासाला 'क्लायमेट फास्ट' असे नाव दिले आहे. मॅगसेसे पुरस्कार विजेते, पर्यावरणवादी, शिक्षण सुधारक आणि सामाजिक कार्यकर्ते असलेल्या वांगचूक यांच्यासह मोठ्या संख्येने स्थानिक लोकही या उपोषणात सहभागी झाले आहेत. एवढ्या मोठ्या उपोषणामुळे वांगचूक यांची तब्येत खालावत चालली आहे. उपोषणामुळे त्यांची प्रकृती किती बिघडली आहे, हे त्यांच्या शरीराची स्थिती, आवाज आणि चेहऱ्यावरील हावभाव यावरून समजू शकते. वांगचूक यांच्यासोबत दोन हजार लोक उपोषणाला बसले आहेत. याशिवाय लडाखच्या विविध भागात लोक उपोषणात सहभागी होत आहेत. समुद्रसपाटीपासून साडेतीन हजार मीटर उंचीवर शून्याखालील तापमानात मोकळ्या जागेत उपोषण करणे सोपे नाही. पाकिस्तान आणि चीन या दोन देशांच्या सीमेवर असलेल्या आणि संवेदनशील असलेल्या भागात इतके दिवस लोकांना अस्वस्थ ठेवणे योग्य नाही. लडाखमधील जनतेने अचानक आंदोलन आणि निषेधाचा मार्ग स्वीकारला आहे, असे नाही. भारतीय जनता पक्षाने जम्मू-काश्मीरपासून वेगळे बनलेल्या लडाख या केंद्रशासित प्रदेशाचा राज्यघटनेच्या सहाव्या अनुसूचीमध्ये समावेश करण्याचे आश्वासन दिले होते. गेल्या लोकसभा निवडणुकीतही भाजपच्या जाहीरनाम्यात लडाखचा राज्यघटनेच्या सहाव्या यादीत समावेश करण्याचे आश्वासन दिले होते. त्यानंतर, ऑक्टोबर २०20 मध्ये झालेल्या लडाख स्वायत्त हिल डेव्हलपमेंट कौन्सिल, लेहच्या निवडणुकीत भाजपने आपल्या जाहीरनाम्यात हे वचन समाविष्ट केले. उच्चस्तरीय समिती स्थापन करून मोदी सरकार केवळ चर्चेच्या नावाखाली वेळ वाया घालवत राहिले. या वर्षी मार्चच्या पहिल्या आठवड्यात लडाखच्या जनतेला लक्षात आले, की मोदी सरकार आपल्या आश्वासनांपासून मागे जात आहे. या मागणीचा जोरदार पुरस्कार करीत २०१९ मध्ये लोकसभेची लडाखची जागा जिंकण्यात भाजपला यश आले होते. यासोबतच ऑक्टोबर २०20 मध्ये झालेल्या लेह परिषदेच्या निवडणुकीतही भाजपला बहुमत मिळाले होते. स्थानिक जनतेने प्रथम केंद्र सरकारशी चर्चेचा मार्ग स्वीकारला. या मुद्द्यावर लडाखच्या प्रतिनिधींनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचीही चार मार्च रोजी दिल्लीत भेट घेतली होती. मोदी सरकारकडून कोणताही ठोस पुढाकार न घेतल्याने लडाखच्या लोकांनी उपोषण करण्याचा निर्णय घेतला.

मोदी सरकारने लडाखच्या लोकांच्या मागण्या मान्य केल्या नाहीत, तर या 'क्लायमेट फास्ट'चे आमरण उपोषणात रूपांतर होईल, असे त्यांनी त्या दिवशी स्पष्ट केले होते. हे उपोषण सुरू होऊन २१ दिवस झाले आहेत. दरम्यान, केंद्र सरकारकडून या विषयावर कोणतीही हालचाल दिसत नाही. अशा परिस्थितीत लडाखच्या जनतेचा आवाज दिल्लीपर्यंत पोहोचत नाही का, असा प्रश्न उपस्थित होत आहे. मोदी सरकारकडून या मुद्द्यावर अलीकडे काहीही बोलले गेले नाही. वांगचूक यांची प्रकृती ढासळत असतानाही दिल्लीत कोणतीही हालचाल दिसत नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या प्रश्नावर संवेदनशीलतेने पावले उचलण्यासाठी पुढाकार घ्यायला हवा होता. लडाख हे पर्यावरणाच्या दृष्टिकोनातून आणि सामरिक दृष्टिकोनातूनही भारतासाठी खूप महत्त्वाचे आहे. चीन अनेक वर्षांपासून लडाखच्या अनेक भागांवर लक्ष ठेवून आहे. गेल्या सात दशकात सीमेवर दोन्ही बाजूंच्या सैनिकांमध्ये अनेक चकमकी झाल्या आहेत. चिनी घुसखोरी रोखण्याच्या प्रयत्नात भारतीय जवानांना आपले प्राण गमवावे लागले आहेत. भारत-चीन सीमेसाठी वास्तविक नियंत्रण रेषा हा शब्द वापरतात. भारताची चीनशी सीमा लडाख केंद्रशासित प्रदेश तसेच हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, सिक्कीम आणि अरुणाचल प्रदेश यांनी सामायिक केली आहे. भारत-चीन सीमा तीन विभागांमध्ये विभागली जाऊ शकते. पश्चिम, मध्य किंवा पूर्व क्षेत्र. पश्चिम क्षेत्र हे लडाखचे क्षेत्र आहे. या भागात भारताची चीनशी १५९७ किलोमीटर लांबीची सीमा आहे. तीन क्षेत्रांपैकी या क्षेत्राची चीनशी सर्वाधिक सीमा आहे. पँगॉन्ग लेक हे जगातील सर्वात सुंदर तलावांपैकी एक, लडाखमध्ये आहे. हा हिमालयाच्या प्रदेशात १४ हजार फुटांपेक्षा जास्त उंचीवर आहे. वास्तविक नियंत्रण रेषा या तलावातून जाते. हा तलाव १३५ किलोमीटर लांबीच्या जमिनीने वेढलेला आहे. तो सातशे चौरस किलोमीटरपेक्षा जास्त क्षेत्रात पसरलेला आहे. या सरोवराचा ४५ किलोमीटरचा लांबीचा पश्चिम भाग भारताच्या ताब्यात आहे. ९० किलोमीटरचा भाग चीनच्या ताब्यात आहे. पश्चिमेकडील भागात चिनी सैन्याने केलेल्या घुसखोरीच्या प्रयत्नांपैकी एक तृतीयांश प्रयत्न पँगॉन्ग सरोवरालगतच्या भागात होत आहेत. गलवान खोऱ्याचे क्षेत्रफळ चीनच्या दक्षिण शिनजियांग आणि भारताच्या लडाखपर्यंत पसरलेले आहे. भारत आणि चीन यांच्यातील १९६२ च्या युद्धात हा भाग मुख्य केंद्र होता. पूर्व लडाखमधील याच गलवान खोऱ्यात १५ जून २०20 रोजी भारत आणि चीनच्या सैनिकांमध्ये हिंसक चकमक झाली होती. ही घटना गेल्या सहा दशकांतील भारत आणि चीन यांच्या सीमेवरील लष्करी संघर्षाची सर्वात मोठी घटना होती. सुरुवातीपासूनच या सर्व सीमावर्ती भागात लडाखच्या स्थानिक लोकांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. चिनी घुसखोरीच्या प्रयत्नांची माहिती देण्यापासून ते प्रत्येक प्रकारच्या हालचालींवर नजर ठेवली आहे. लद्दाखी लोकांमध्ये पँगॉन्ग सरोवराला खूप महत्त्व आहे. या कारणास्तव, स्थानिक लोक चिनी सैन्याच्या घुसखोरीच्या प्रयत्नांना प्रत्युत्तर देण्यास मागेपुढे पाहत नाहीत. चळवळीशी संबंधित संपूर्ण मोहीम लडाखची जमीन, पर्यावरण आणि आदिवासी स्थानिक संस्कृती जतन करण्याशी संबंधित आहे. वांगचूक हाच पैलू पुन्हा पुन्हा सांगत आहे.

लडाखमधील भटके विमुक्त लोक त्यांच्या मुख्य चरासाठीच्या जमिनी दक्षिणेकडे मोठ्या औद्योगिक वनस्पती आणि उत्तरेकडील चिनी अतिक्रमणांमुळे गमावत आहेत. लडाखची सामाजिक रचना आणि सांस्कृतिक वेगळेपण या दृष्टिकोनातूनही संपूर्ण भाग समजून घेणे आवश्यक आहे. लडाखची खास संस्कृती आहे. लडाख हा आदिवासीबहुल भाग आहे. राष्ट्रीय अनुसूचित जमाती आयोगाच्या मते, लडाखमधील आदिवासी लोकसंख्या एकूण लोकसंख्येच्या ९७ टक्क्यांपेक्षा जास्त आहे. या सर्व भागात सुन्नी मुस्लिमांसह अनेक समुदाय आहेत, जे आदिवासी दर्जाचा दावा करत आहेत. आदिवासी आणि सांस्कृतिक विशिष्टता लक्षात घेऊन, राष्ट्रीय अनुसूचित जमाती आयोगाने लडाखचा सहाव्या अनुसूचीमध्ये समावेश करण्यासाठी सप्टेंबर २०१९ मध्ये केंद्र सरकारला आधीच शिफारस केली होती. तोपर्यंत लडाख हा स्वतंत्र केंद्रशासित प्रदेश म्हणून भारताच्या राजकीय नकाशावर दिसला नव्हता. स्थानिक गरजांनुसार मागणीवर विचारमंथन व्हायला हवे. मोदी सरकारने ऑगस्ट २०१९ मध्ये लडाख हा जम्मू-काश्मीरपासून वेगळा केंद्रशासित प्रदेश करण्याचा निर्णय घेतला होता. त्यानंतर ३१ ऑक्टोबर २०१९ रोजी लडाख अधिकृतपणे केंद्रशासित प्रदेश बनला.

'जम्मू-काश्मीरमधून पूर्ण राज्याचा दर्जाही काढून घेण्यात आला आहे. त्याला विधानसभेसह केंद्रशासित प्रदेश बनवले आहे. याउलट, लडाखला विधानसभेशिवाय केंद्रशासित प्रदेश बनवले आहे. अशा परिस्थितीत लडाखच्या जनतेला लोकशाही चौकटीत स्थानिक गरजांनुसार त्यांच्या राज्यासाठी नियम आणि कायदे बनवण्याचा अधिकार नाही. केंद्र सरकार लडाखसाठी सर्व निर्णय घेण्यास सुरुवात करते आणि उपराज्यपाल तेथील प्रशासन हाताळू लागतात. मुख्य भर सहाव्या अनुसूचीशी संबंधित मागण्यांवर आहे. लडाखच्या जनतेची प्रमुख मागणी म्हणजे त्याचा समावेश संविधानाच्या सहाव्या अनुसूचीमध्ये करण्यात यावा. याशिवाय त्यांच्या मागण्यांमध्ये पूर्ण राज्याचा दर्जा, स्वतंत्र लोकसेवा आयोगाची स्थापना आणि लडाखसाठी दोन लोकसभा संसदीय मतदारसंघांची निर्मिती यांचा समावेश आहे. वांगचूक आणि सर्व सामाजिक-धार्मिक संघटनांचा मुख्य भर सहाव्या अनुसूचीवर आहे. जर मोदी सरकारने ही मागणी मान्य केली तर लडाखमधील जनता सध्यातरी आपले आंदोलन मागे घेईल अशी शक्यता आहे. राज्यघटनेच्या सहाव्या अनुसूचीमध्ये समावेश केल्यामुळे स्थानिक लोकांना विकास प्रकल्पांमध्ये निर्णय घेण्याचा अधिकार मोठ्या प्रमाणात मिळेल. यामुळे केंद्र सरकारला स्थानिक लोकांच्या संमतीशिवाय असे प्रकल्प पुढे रेटणे सोपे जाणार नाही. राज्यघटनेच्या सहाव्या अनुसूचीमध्ये त्याचा समावेश केल्याने लडाखला विकास प्रकल्पांच्या नावाखाली बाह्य हस्तक्षेपापासून संरक्षण मिळण्यास मदत होऊ शकते. पर्यावरण, हिमनदी, भटके विमुक्त आदिवासी समुदाय तसेच येथील अद्वितीय संस्कृती वाचवण्यासाठी सहाव्या अनुसूचीशी संबंधित मागणी अत्यंत समर्पक आहे.

लडाखप्रकरणी सत्ताधारी भाजपच्या वृत्तीसोबतच काँग्रेससह सर्व विरोधी पक्षांचे मौनही आश्चर्यकारक आहे. काँग्रेसच्या सर्वोच्च नेतृत्वापासून ते इतर विरोधी पक्षांच्या बड्या नेत्यांपर्यंत विरोधी पक्ष या मुद्द्यावर संवेदनशील असल्याचे दिसले नाही. लडाखमधील जनता गेल्या अनेक महिन्यांपासून आंदोलन करीत असताना विरोधी पक्षांच्या एकाही मोठ्या नेत्याने लडाखमध्ये जाऊन या आंदोलनात सहभाग घेतला नाही. वेळोवेळी काही विरोधी नेते दिल्लीत बसून विधाने किंवा 'सोशल मीडिया' पोस्टद्वारे लडाखच्या मागणीचे समर्थन करताना दिसतात; मात्र मोदी सरकारवर दबाव टाकण्याच्या दृष्टिकोनातून काहीच करीत नाही. लडाख आंदोलनाला विरोधी पक्षांकडून उघड पाठिंबा मिळू लागला तर मोदी सरकारवर दबाव आणण्यासाठी हे एक प्रभावी पाऊल ठरेल.

भागा वरखडे

# आरोग्य विभागाच्यावतीने क्षयरोगाबाबत जनजागृती

**राजदंड / वडगाव मावळ**

जागतिक क्षयरोग दिनानिमित्त मावळ तालुक्यात केंद्र सरकारच्या प्रधानमंत्री क्षयमुक्त भारत अभियानांतर्गत,मावळ तालुक्यात आरोग्य विभागाच्या वतीने क्षयरोगाबाबत जनजागृती, प्रतिबंधात्मक उपाय व उपचारांबाबत विविध उपक्रम राबविले जात असल्याची माहिती तालुका आरोग्याधिकारी डॉ. शॅरन सोनवणे व वरिष्ठ उपचार पर्यवेक्षक पी.आर.वंजारी यांनी दिली आहे.

मावळ तालुक्यात सध्या ४२७ क्षयरुग्णांवर उपचार चालू आहेत. क्षयरुग्णांना उपचार कालावधीत पोषण आहार मिळाला नाही; तर उपचाराचे सकारात्मक परिणाम दिसून येतातच असे नाही. त्यामुळे, केंद्र सरकारच्या प्रधानमंत्री क्षयमुक्त भारत अभियानांतर्गत, निक्षय मित्रांनी क्षयरुग्णांसाठी ६ महिने ते ३ वर्षांसाठी कोरडा पोषण आहार पुरविण्यासाठी पुढे यावे. तसेच अधिकाधिक लोकांनी वैद्यकीय चाचण्या करुन घ्याव्यात, असे आवाहन तालुका आरोग्य विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.



मावळ तालुक्यात २०२२ मध्ये एकूण ७५६ क्षयरुग्णांची नोंद झालेली असून त्यापैकी ६९७ रुग्ण बरे झाले आहेत. तसेच २०२३ मध्ये ५४७ नवीन क्षयरुग्णांची नोंद झालेली आहे. क्षयरोग तपासणीसाठी अकरा सूक्ष्मदर्शक केंद्रे कार्यान्वित असून एक ट्रुनाट मशीन उपलब्ध आहे.

देशाने २०२५ पर्यंत क्षयरोगाचे दूरीकरण करण्याचे धोरण निश्चित केले आहे. त्यादृष्टीने केंद्र शासनाने प्रधानमंत्री क्षयरोगमुक्त भारत अभियान सुरु केले आहे. त्यात विविध देणगीदार व्यक्ती, स्वयंसेवी संस्था, सहकार सेवा, विविध संस्था, लोकप्रतिनिधी ज्यांना निक्षय मित्र असे संबोधण्यात येते. त्यांच्यामार्फत क्षयरुग्णांना ६ महिने ते ३ वर्षांसाठी रुग्णांना कोरडा पोषण आहार पुरविण्यात येऊ शकतो. त्यासाठी निक्षय मित्रांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

**अतिजोखमीच्या व्यक्ती**

थुंकीदूषित क्षयरोग्याच्या संपर्कातील व्यक्ती, एचआयव्हीबाधित रुग्ण, मधूमेही, उच्च रक्तदाब असलेला रुग्ण, प्रतिकारशक्ती कमी झालेली व्यक्ती, फुफ्फुसाचे जुनाट आजार असलेली व्यक्ती (उदा. सिलीकोसीस, दमा इ.) वृध्द व्यक्ती, कुपोषित व्यक्ती, मूत्रपिंडाचे रुग्ण तसेच स्टेरॉईड घेणारी व्यक्ती यांना एक दिवसाचा जरी खोकला असला तरी त्यांची क्षयरोगाची तपासणी करून घ्यावी.

नवीन क्षयरुग्ण कळवा आणि ५०० रुपये मिळवा !

शासकीय योजनेअंतर्गत कोणत्याही व्यक्तीने संशयित क्षयरुग्णास तपासणीसाठी संदर्भित केल्यास व त्या संशयितास क्षयरोगाचे निदान झाल्यास संदर्भित करणार्या व्यक्तीच्या बँक खात्यात आता ५०० रुपये जमा केले जात आहेत. याखेरीज, प्रत्येक क्षयरुग्णास उपचार पूर्ण होईपर्यंत प्रतिमहा ५०० रुपये अनुदान पोषण आहार आणि विनामूल्य औषधे देण्यात येत आहेत.

## जनजागृतीपर कार्यक्रम

**सर्व आरोग्य संस्थांमध्ये मेळावे भरवून संशयित क्षयरुग्णांची तपासणी करून घेणे.**

**क्षयरोगाबाबत जनजागृती करण्यासाठी फेरी काढणे, कोपरा सभा घेणे.**

**क्षयरुग्णांच्या सहवासातील व्यक्तींची तपासणी करणे.**

**गरजूंना क्षयरोग प्रतिबंधात्मक उपचार देणे.**

**लोकप्रतिनिधी व सामाजिक कार्यकर्त्यांना निक्षय मित्र बनविणे.**

**क्षयरोगाची लक्षणे**

**दोन किंवा दोन आठवड्यांपेक्षा जास्त दिवसांचा बेडकायुक्त खोकला.**

**बारीक परंतु संध्याकाळी वाढणारा ताप, वजन कमी होणे, भूक मंदावणे, छातीत दुखणे.**

**रात्री घाम येणे, बेडक्यातून रक्त पडणे, मानेवर गाठी येणे.**

**क्षयरोग पूर्णपणे बरा होऊ शकतो. मात्र, त्यावरील उपचार निश्चित मुदतीपर्यंत डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार पूर्ण केला पाहिजे. इच्छुक देणगीदारांनी प्रधानमंत्री क्षयरोगमुक्त भारत अभियानाअंतर्गत निक्षय मित्र योजनेत सहभागी व्हावे. गरजू क्षयरुग्णांना पोषण आहार पुरवावा जेणेकरून क्षयरुग्ण लवकर बरे होतील. तसेच क्षयरोगाचा इतर लोकांना संसर्ग होण्याचा धोका कमी होईल.**

**- डॉ. शॅरन सोनवणे, मावळ तालुका आरोग्याधिकारी**

# शिरोळ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील १०३ जणांवर प्रतिबंधात्मक कारवाईचा प्रस्ताव सादर

## : पोलीस निरीक्षक शिवाजीराव गायकवाड

**शिरोळ :** येथील शिरोळ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील १०३ जणांच्यावर प्रतिबंधात्मक कारवाई करण्याचा प्रस्ताव तहसीलदार अनिलकुमार हेळकर व कोल्हापुर येथील एलसीबीच्या पोलीस निरीक्षकांच्याकडे पाठवण्यात आला असल्याची माहिती शिरोळ पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शिवाजीराव गायकवाड यांनी दिली.

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर २०१९ सालापासून झालेल्या निवडणुकीमध्ये ज्या ज्या व्यक्तींच्यावर वेगवेगळ्या कलमाअंतर्गत गुन्हे दाखल केले आहेत. अशांच्यावर प्रतिबंधात्मक कारवाईसाठी प्रस्ताव सादर केला आहे. तसेच सीआरसी कलम १०७ प्रमाणे नोटीसी लागू करण्यात आलेल्या आहेत.

शिरोळ पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये शिरोळ, नृसिंहवाडी ,शिरटी, हसुर, कनवाड, कुटवाड, घालवाड, अर्जुनवाड, चिंचवाड, धरणगुत्ती, संभाजीपूर, नांदणी ,हरोली, जांभळी, टाकवडे व मौजे आगर या गावातील गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तींना सीआरसी कलम १०७ प्रमाणे नोटिसा लागू करण्यात आल्या असून त्यांच्यावर प्रतिबंधक करवाई करण्यासाठी तहसीलदार अनिलकुमार हेळकर व एलसीबीच्या अधिकाऱ्यांच्याकडे अहवाल सादर केला असून संबंधित व्यक्तीकडून लेखी जबाब व एक जामीन घेण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

तसेच या पोलीस स्टेशनच्या हद्दीतील गावातील परवानाधारक शस्त्रधारकानाही आपल्या ताब्यातील परवाना असलेले शस्त्र

# मावळात पोलिसांच्या नाकाबंदी दरम्यान सापडले ५० लाखांची रोकड जप्त

**वडगाव मावळ :** लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मावळ तालुक्यातील पुणे मुंबई महामार्गावरील उर्से टोलनाक्यावर पोलिसांच्या नाकाबंदी दरम्यान तब्बल ५० लाखांची रोकड आढळून आल्याने खळबळ उडाली या रक्कमेत बाबत चौकशी शिरगाव पोलीस करत आहेत. अशी माहिती पोलीस उपायुक्त बापू बांगर यांनी दिली आहे. लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मावळ तालुक्यात ठिकठिकाणी नाकाबंदी करण्यात आली आहे.यावेळी मावळ लोकसभा मतदारसंघाच्या पुणे- मुंबई द्रुतगती मार्गावर नाका बंदी दरम्यान शिरगाव पोलिसांनी चारचाकी वाहनात तब्बल ५० लाख रुपयांची रोकड मिळून आली आहे.

मुंबईहून पुण्याच्या दिशेने ही चार चाकी जात असताना पोलिसांनी अडवली. यात ५० लाख रुपये आढळले आहेत. एवढी मोठी रक्कम कुठे आणि कशासाठी घेऊन जात होते. याबाबतची चौकशी शिरगाव पोलीस करत आहेत. सध्या लोकसभा निवडणुका लागल्याने मोठ्या प्रमाणावर घोडेबाजार होण्याची शक्यता आहे. त्याच अनुषंगाने पिंपरी- चिंचवड पोलीस तपास करत आहेत.

# खुन केल्याच्या प्रकरणी जयसिंगपुर सत्र न्यायालयाने ठोठावली फाशीची शिक्षा

**कुरुंदवाड :** ६ ऑक्टोंबर २०१८ रोजी यड्राव, ता. शिरोळ येथे पहाटे ०४.३० वा. च्या पूर्वी प्रदिप विश्वनाथ जगताप, रा. कवठेगुलंद, ता. शिरोळ, सध्या रा. शिरगावे मळा, पार्वती औद्योगीक वसाहतीच्या मागे, यडाव, ता. शिरोळ याने त्याची पत्नी रूपाली प्रदिप जगताप हिवे चारित्र्यावर संशय घेवून भांडण काढून मागाच्या लाकडी मान्याने सासू छाया श्रीपती आयरेकर, पत्नी रूपाली, मेव्हणी सोनाली रावण, मेव्हणा रोहीत श्रीपती आयरेकर यांना डोकीत मारून गंभीर जखमी करून जिवे ठार मारून त्यांचा खून केला. सदर घटनेमध्ये आरोपीच्या पत्नीचा, सासूचा, मेव्हण्याचा व मेहुणी मृत्यू झाला.

शहापूर पोलिस ठाण्याचे तत्कालिन प्रभारी पोलिस निरीक्षक . आय. एस. पाटील, शिवाजीनगर पोलिस ठाणे यांनी प्राथमिक तपास करून व त्यानंतर शहापूर पोलिस ठाण्याचे तत्कालिन सहा. पोलिस निरीक्षक . एस. ए. हारुगडे यांनी सखोल तपास करून या न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले होते. खटला जयसिंगपूर येथील मा. अति. सत्र न्यायाधिश . जी. बी. गुरव यांचेसमोर भा.द.वि.स. कलम ३०२



प्रमाणे चालविण्यात आला. सदर कामी सरकार पक्षातर्फे एकून २४ साक्षीदार सरकारी वकील विद्याधर सरदेसाई यांनी तपासले. सदर कामी सरकारी वकील म्हणून ॲड. व्ही. जी. सरदेसाई यांनी काम पाहिले.

बाल साक्षीदार म्हणून आरोपीची मुलगी सानवी ही प्रत्यक्षदर्शी साक्षीदार होती, तीने मे. कोर्टासमोर घडलेली घटना सांगितली. तिचा पुरावा ग्राहय मानून तसेच, आरोपीच्या जप्त केलेल्या कपडयावर मयताचे रक्ताचे डाग होते, तसेच, घटनेपूर्वी रात्री ०८.३० वा., ११.०० वा. झालेले भांडण अन्य साक्षीदारांनी सांगितले, तसेच, वैद्यकीय अधिकारी यांच्या साक्षी व प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पंच साक्षीदार यांच्या साक्षी महत्वाच्या ठरल्या. त्या साक्षी व सरकारी वकीलांचा युक्तीवाद ग्राहय मानून मा. अति. सत्र न्यायाधिश, जयसिंगपूर . जी. बी. गुरवसो यांनी आरोपी प्रदिप विश्वनाथ जगताप यास भा.द. वि. सं. कलम ३०२ खुनाचे कलमामध्ये दि.२२ मार्च २०२४ रोजी दोषी धरले होते. तद्नंतर, दि. २६/०३/२०२४ रोजी सरकारी वकीलांचा व आरोपीच्या वकिलांचा शिक्षेबाबत युक्तिवाद ऐकून मे. कोर्टाने ही घटना ही दुर्मीळातील दुर्मीळ घटना असलेने व एकच वेळी वार व्यक्तींचा खुन झाला असलेने सदरची घटना ही अन्य पुराव्याअंती दुर्मीळात दुर्मीळ धरून आरोपी प्रदिप जगताप यास मरेपर्यंत फाशीची शिक्षा व रू. १०,०००/- दंड व दंड न जमा केल्यास एक वर्षाची सक्तमजूरी अशी शिक्षा सुनावलेली आहे.

सदरची मा. अति. जिल्हा न्यायाधिशसो, जी बी . गुरव यांचे कालावधीतील ही नववी शिक्षा असून या महिन्यातील तीसरी शिक्षा आहे. सरकारी वकील विद्याधर. सरदेसाई सरकारी वकील उदय कुलकर्णी यांनी आतापर्यंत त्यांनी चालविलेल्या प्रकरणात इचलकरंजी व जयसिंगपूर येथील अति. जिल्हा व सत्र न्यायालयाने एकूण ६८ प्रकरणात शिक्षा सुनावल्या आहेत ६८ शिक्षांमधील सदरची पहिलीच फाशीची शिक्षा आहे.

# भाजपमधील वाद चव्हाट्यावर

**रावेर :** लोकसभामतदारसंघातून भाजपने पुन्हा एकदा विद्यमान खासदार रक्षा खडसे यांना उमेदवारी जाहीर केली आहे. राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे ज्येष्ठ नेतेएकनाथ खडसेयांच्या स्नुषा असलेल्या रक्षा खडसेंवर भाजपने पुन्हा विश्वास दर्शवल्याने राजकीय निरीक्षकांच्या भुवया उंचावल्या. भाजपच्या या अनपेक्षित खेळीमुळे राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाची कोंडी झाल्याचं पाहायला मिळत आहे. मात्र दुसरीकडे रक्षा खडसे यांच्या उमेदवारीवरून भाजपमध्येही अंतर्गत वाद असल्याचं चित्र असून याबाबतचा एक व्हिडिओ सध्या व्हायरल झाला आहे.

भाजप नेते आणि राज्याचे कॅबिनेट मंत्रीगिरीश महाजनयांच्या उपस्थितीत झालेल्या पक्षाच्या बैठकीत काही पदाधिकाऱ्यांनी रक्षा खडसे या राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांना सोबत घेऊन प्रचारासाठी फिरत असल्याचं सांगत भाजप पदाधिकाऱ्यांकडे दुर्लक्ष केलं जात असल्याचा आरोप केला. या घटनेचा व्हिडिओ समोर आल्याने भाजपमधील वाद चव्हाट्यावर आला असून याबाबत रक्षा खडसे यांनी खुलासाही केला आहे.-

भाजप पदाधिकाऱ्यांच्या नाराजीवर बोलताना रक्षा खडसे यांनी म्हटलं आहे की, आता निवडणूक जाहीर झाली आहे. अशावेळी सर्वच पक्षांमध्ये असे छोटेमोठे वाद होत असतात. मात्र गिरीशभाऊंनी सगळ्यांची बैठक घेऊन समजूत काढली आहे. माझ्या



मते हा काही फार मोठा मुद्दा नाही. मात्र हा व्हिडिओ कोणी व्हायरल केला आणि त्यामागे त्यांचा काय उद्देश आहे, हे मला माहीत नाही. मी राष्ट्रवादीच्या लोकांना सोबत घेऊन काम केलं असतं तर पक्षाने उमेदवारीसाठी माझा विचार केला नसता. आम्ही काय करतो, याकडे पक्षाचं लक्ष असतं, असं स्पष्टीकरण रक्षा खडसे यांनी दिलं आहे. दरम्यान, भाजपचे काही पदाधिकारी बैठकीत रक्षा खडसे यांच्यावर राष्ट्रवादीशी असलेल्या जवळीकीबद्दल आरोप करत असल्याचं व्हायरल व्हिडिओमध्ये दिसत आहे. या बैठकीलागिरीश महाजनआणि भाजपचे चाळीसगावचे आमदार मंगेश चव्हाण हेदेखील उपस्थित होते.रावेरलोकसभेबाबतएकनाथ खडसेंचीभूमिका काय? रावेरमध्ये भाजपकडून रक्षा खडसे यांना उमेदवारी देण्यात आल्यानंतर काही दिवसांपूर्वी एकनाथ खडसे यांनी आपली भूमिका स्पष्ट केली होती. लोकसभेची निवडणूक लढवण्यासाठी मला डॉक्टरांनी प्रकृतीच्या कारणास्तवपरवानगी दिलेली नाही. त्यामुळे मी रावेर लोकसभा मतदारसंघातून निवडणूक लढवणार नाही. तसंच रोहिणी खडसे यांनीही लोकसभा निवडणूक लढवण्याबाबत कधीही विचार केला नव्हता. त्या केवळ विधानसभा निवडणूक लढवायची आहे, असा विचार करून मागच्या चार-पाच वर्षांपासून काम करत आहेत. त्यामुळे रोहिणी खडसे यादेखील रावेर लोकसभा मतदारसंघातून निवडणूक लढवणार नाहीत, अशी माहिती एकनाथ खडसे यांच्याकडून देण्यात आली होती.

मालक, मुद्रक, प्रकाशक नरेश व्ही. देसाई यांनी सरस्वती प्रिंटिंग प्रेस, १६ मंगळवार पेठ, सातारा येथे मुद्रित करून, रामकमल बिल्डिंग, ७, रामकृष्ण कॉलनी, सिव्हिल हॉस्पिटल रोड, सातारा येथून प्रकाशित केले. संपादक : नरेश व्ही. देसाई. फोन : ९९६०३५०९९९, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : ७२१०५/९९
Owner, Printer, Publisher Naresh V. Desai. Printed at Saraswati Printing Press, 16 Mangalwar Peth, Satara. Published from Ramkamal Building, 7, Ramkrishna Colony, Civil Hospital Road, Satara. Editor : Naresh V. Desai. Phone : 9960350999, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : 72105/99

# रवींद्रनंतर ऋतुराजची फटकेबाजी, दहाव्या षटकातच चेन्नईची शंभरीपार मुसंडी



आयपीएलमध्ये आज गुजरातविरुद्ध सुरू असलेल्या सामन्यात चेन्नई सुपरकिंग्सने तुफानी सुरुवात केली आहे. रचिन रवींद्रने सुरुवातीपासून गुजरातच्या गोलंदाजांवर वर्चस्व गाजवल्यानंतर कर्णधारऋतुराज गायकवाडनेआक्रमक फलंदाजी करत चेन्नईला अवघ्या ९.५ षटकांमध्येच शंभरीपार मजल मारून दिली.

आज चेन्नई सुपरकिंग्स आणिगुजरात टायटन्सयांच्यात सुरू असलेल्या लढतीमध्ये गुजरातने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतल्यावर चेन्नईने धमाकेदार सुरुवात केली. कर्णधारऋतुराज गायकवाडआणि रचिन रवींद्र यांनी चौकार-षटकारांची आतिषबाजी करत अवघ्या २७ चेंडूत चेन्नईचं अर्धशतक फलकावर लावले.दरम्यान, गुजरातचा यष्टीरक्षक वृद्धिमान साहाने जबरदस्त यष्टीरक्षाचं दर्शन घडवलं.

रशिद खानने टाकलेल्या डावातील सहाव्या षटकात जबरदस्त फलंदाजी करत असलेला रचिन रवींद्र उत्तुंग फटका खेळण्याच्या नादात चकला आणि वृद्धिमान साहाने चपळाईने यष्ट्या उद्धस्त करत त्याला परतीचा रस्ता दाखवला. रवींद्रने २० चेंडूत ६ चौकार आणि ३ षटकारांच्या मदतीने ४६ धावा कुटल्या. मात्र त्याचं अर्धशतक अवघ्या ४ धावांनी हुकलं.वींद्र बाद झाल्यानंतर ऋतुराज गायकवाडने मोर्चा सांभाळला. त्याने अजिंक्य रहाणेच्या साथीने संघाला शंभरीपार मजल मारून दिली.

# विराट कोहली दोन महिने कुठे होता? स्वत:च उघड केले गुपित

आयपीएलच्या १७ व्या हंगामातील सहावा सामना सोमवारी एम. चिन्नास्वामी स्टेडियम बंगळुरु येथे पार पडला. या सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु आणि पंजाब किंग्ज आमनेसामने होते. ज्यामध्ये आरसीबीने पीबीकेएसचा ४ विकेट्सनी पराभव केला. यानंतर विराट कोहलीला त्याच्या शानदार अर्धशतकी खेळीसाठी सामनावीराचा पुरस्कार देण्यात आला. यावेळी कोहलीने खुलासा केली की तो मागील काही दिवसापूर्वी आपल्या देशात नव्हता. तसेच तो जिथे त्याच्या



कुटुंबाबरोबर वेळ घालवत होता, तिथे त्याला लोक ओळखत नव्हते.

विराट कोहली आपल्या दुसऱ्या मुलाच्या जन्मामुळे इंग्लंडविरुद्धच्या पाच कसोटी सामन्यांच्या मालिकेत खेळू शकला नाही. दरम्यान, त्याने कुटुंबासोबत चांगला वेळ घालवला. आयपीएलमध्ये पंजाब किंग्जविरुद्धच्या सामन्यात ७७ धावांची खेळी करून आरसीबीच्या विजयात महत्त्वाची भूमिका बजावल्यानंतर कोहलीने हे वक्तव्य केले. त्याने सांगितले की, कुटुंबासह बराच वेळ घालवून चांगले वाटत आहे.

**विराट कोहली काय म्हणाला?**

विराट कोहली म्हणाला, आम्ही देशात (भारतात) नव्हतो. आम्ही अशा ठिकाणी होतो, जिथे लोक आम्हाला ओळखत नव्हते. मी दोन महिने माझ्या कुटुंबासह सामान्य माणसाप्रमाणे वेळ घालवला. एक कुटुंब म्हणून आमच्यासाठी हा एक अद्भुत अनुभव होता. मला माझ्या कुटुंबाबरोबर वेळ घालवण्याची संधी मिळाली याबद्दल मी देवाचा ऋणी आहे.

सर्वसामान्यांसारखे दैनंदिन जीवन जगणे हा एक अद्भुत अनुभव होता - किंग कोहली पुढे म्हणाले, आपल्याला कोणीही ओळखत नसताना सामान्य माणसाप्रमाणे रस्त्यावरून चालणे आणि सर्वसामान्यांसारखे दैनंदिन जीवन जगणे हा एक अद्भुत अनुभव होता. १५ फेब्रुवारी २०२४ रोजी कोहली दुसऱ्यांदा वडील झाला, जेव्हा त्याची पत्नी अनुष्काने एका मुलाला जन्म दिला. या दोघांनी आपल्या मुलाचे नाव अकाय ठेवले आहे.

**विराट कोहलीने झळकावले ५१ वे अर्धशतक** - आयपीएलच्या पहिल्या सामन्यात मोठी खेळी खेळण्यात अपयशी ठरल्यानंतर दुसऱ्या सामन्यात कोहलीने शानदार फलंदाजी केली. पंजाबने विजयासाठी दिलेल्या १७७ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना आरसीबीने चार चेंडू बाकी असताना रोहमर्षक विजय मिळवला. या सामन्यात विराट कोहलीने आयपीएल कारकीर्दीतील ५१वे अर्धशतक झळकावले. कोहलीने ४९ चेंडूत ११ चौकार आणि २ षटकारांच्या मदतीने ७७ धावा केल्या. आरसीबीला शेवटच्या २४ चेंडूंमध्ये ४७ धावांची गरज होती, तेव्हा दिनेश कार्तिकने दहा चेंडूत नाबाद २८ धावा केल्या आणि 'इम्पॅक्ट प्लेयर' महिपाल लोमरोरने आठ चेंडूत नाबाद १७ धावा केल्या. तसेच कार्तिकने फिनिशरची भूमिका अतिशय चोख बजावली.

# रितेश देशमुखची मुले फुटबॉल खेळण्यासाठी परदेशात

बॉलिवूडमधील सर्वांचे आवडते, लाडके कपल म्हणून अभिनेता रितेश देशमुख आणि अभिनेत्री जिनिलिया देशमुख ओळखले जातात. दोघे सतत एकमेकांसोबत वेळ घालवतानचे फोटो आणि मजेशीर रिल्स शेअर करताना दिसत आहेत. त्यामुळे रितेश आणि जिनिलिया हे महाराष्ट्रात खास करुन दादा-वहिनी म्हणून ओळखले जातात. नुकताच जिनिलियाने सोशल मीडियावर रितेशचा एक फोटो शेअर केला आहे. या फोटोमध्ये तो मुलांची फुटबॉल मॅच खेळताना दिसत आहे.

रितेश आणि जिनिलियाची दोन्ही मुले ही कायमच फूटबॉल खेळताना दिसतात. त्यांचे मैदानावरील फोटो आणि व्हिडीओ देखील अनेकदा समोर आले आहेत. आता या दोघांच्या कष्टाचे चिझ झाले आहेत. इतक्या कमी वयात दोघांची एका नामांकित फूटबॉल स्पर्धेसाठी निवड झाली आहे. त्यांची फूटबॉल मॅच ही परदेशात होती. ती पाहण्यासाठी रितेश आणि जिनिलिया गेले होते.

जिनिलियाने तिच्या अधिकृत इन्स्टाग्राम अकाऊंटच्या स्टोरीला रितेशचा मुलांची फूटबॉल मॅच पाहतानाचा फोटो शेअर केला आहे. या फोटोमध्ये रितेशने निळ्या रंगाचे जॅकेट, काळ्या रंगाचा गॉगल लावला आहे. तसेच तो शिट्टी वाजवताना दिसत आहे.

जिनिलियाने रितेशच्या फोटोवर, मी माझ्या मुलांना नेहमी सांगत असते तुमची मॅच सुरु असताना प्रेक्षकांमधून ऐकू येणारी सर्वात मोठ्या आवाजाची शिट्टी ही तुमच्या बाबाची असेल आणि तो कायम त्याचा शब्द पाळतो. आमची ७ आणि ९ वर्षांची मुले एवढ्या लवकर इरीलरखपवळर कडून खेळतील असे मला खरच वाटले नव्हते या आशयाचे कॅप्शन दिले आहे.

रितेश आणि जिनिलिया हे दोघेही मुलांची मॅच पाहण्यासाठी स्पेश येथील स्टेडियममध्ये गेले होते. जिनिलिया सतत मुलांकडे लक्ष देत असते. ती इंडस्ट्रीमध्ये फारशी सक्रिय असल्याचे पाहायला मिळत नाही. दोघांचा वेड हा चित्रपट काही दिवसांपूर्वी प्रदर्शित झाला होता. या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर तुफान कमाई केली होती. आता रितेशचा 'हाऊसफुल्ल ५' हा चित्रपट प्रेक्षकांच्या

# धोनीसमोर नसतानाही चेपॉकवर गोंधळला गिल

**नाणेफेकीदरम्यान केली मोठी चूक**

इंडियन प्रीमियर लीग २०२४ चा सातवा सामना चेन्नई सुपर किंग्ज आणि गुजरात टायटन्स यांच्यात खेळला जात आहे. दोन्ही कर्णधार नाणेफेकीसाठी मैदानात आले तेव्हा नाणे नाणेफेक गुजरात टायटन्सच्या बाजूने पडले. आणि जेथे, शुभमन गिलने प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे ऋतुराज गायकवाडच्या नेतृत्वाखालील चेन्नई सुपर किंग्ज संघ प्रथम फलंदाजीसाठी मैदानात उतरणार आहे.

पण नाणेफेकीच्या वेळी शुभमन गिल गोंधळल्या दिसला. त्याने प्रथम फलंदाजी करायची असल्याचे सांगितले, पण नंतर निर्णय बदलून गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. म्हणजेच चेन्नईचा संघ प्रथम फलंदाजी करेल. ज्याचा व्हिडिओ आता सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे.

आज चेन्नईच्या एमए चिदंबरम स्टेडियमवर चेन्नई सुपर किंग्ज आणि गुजरात टायटन्स यांच्यात चुरशीची स्पर्धा पाहायला मिळणार आहे. दोन्ही संघ आपला पहिला सामना जिंकून मैदानात उतरले आहेत.

जेथे, सीएसकेने सुरुवातीच्या सामन्यात आरसीबीचा पराभव केला. त्याचवेळी गुजरातने आपल्या पहिल्या साखळी सामन्यात मुंबईचा पराभव केला. आता या सामन्यात नाणेफेक जिंकल्यानंतर शुभमन गिलने



गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे चेन्नई सुपर किंग्जचा संघ प्रथम फलंदाजीसाठी मैदानात उतरणार आहे.

प्लेइंग इलेव्हनबद्दल बोलायचे तर, गुजरातने याच संघासह मैदानात उतरले आहे. त्याचवेळी चेन्नईने एक महत्त्वाचा बदल केला आहे. नाणेफेकीदरम्यान गायकवाडने सांगितले की, आमचा मलिंगा म्हणजेच पाथिराणा पुनरागमन करत आहे. तीक्षानाच्या जागी तो प्लेइंग इलेव्हनमध्ये सामील होईल.




## बाप मागणार लेकाची माफी! सायलीच्या चतुराईमुळे सुभेदारांच्या घरात आनंदाचं वातावरण



'ठरलं तर मग' या मालिकेच्या भागात प्रेक्षकांना महिपतला बेड्या पडताना पाहायला मिळणार आहे. संतोषच्या मुलीचा जीव वाचवल्यामुळे तो देखील सायलीची मदत करण्यासाठी तयार झाला होता. आता संतोष कोर्टात हजर होऊन महिपत विरोधात साक्ष देणार आहे. आजच्या भागाच्या सुरुवातीलाच संतोष कोर्टात आपली साक्ष देताना पाहायला मिळणार आहे. महिपतच्या गुंडांनी आपल्या कुटुंबाला त्रास देऊन हे सगळं काम करून घेतल्याचे तो म्हणणार आहे. तर, ही घटना सुरू झाल्यापासून ते पुराव्यांचा पेनड्राईव्ह सायलीपर्यंत पोहोचवण्यापर्यंत काय काय घडलं हे तो कोर्टासमोर सांगणार आहे. संतोषचा जबाब पूर्ण झाल्यावर अर्जुन आपला युक्तिवाद मांडणार आहे.

यावेळी अर्जुन म्हणणार आहे की, महिपत शिखरे हाच या ड्रग्ज केसचा मुख्य सूत्रधार असून, पुरावे बाहेर येऊ नयेत म्हणून त्याने मिसेस सायली सुभेदार यांना देखील किडनॅप केले होते. भर कोर्टात सायलीबद्दल हे ऐकल्यावर सगळ्यांनाच मोठा धक्का बसला आहे. तर, सायली किडनॅप झाली होती आणि तिला कोणी किडनॅप केलं होतं, हे देखील अर्जुनला माहिती आहे, हे कळल्यानंतर साक्षी आणि महिपतचे धाबे दणाणले आहेत. यावेळी सायली देखील आपला जबाब नोंदवणार आहे. सायली तिच्यासोबत घडलेला सगळा प्रकार कोर्टासमोर सांगणार आहे. सायली सांगत असलेला सगळा घटनाक्रम ऐकल्यावर सुभेदार कुटुंबासह तिथे उपस्थित असलेल्या सगळ्यांनाच मोठा धक्का बसणार आहे.

सायली सुभेदार ही माझी बायको, तर प्रताप सुभेदार हे माझे बाबा असून, केवळ आश्रमाच्या केसमध्ये फेरफार करण्यासाठी आमच्या कुटुंबियांना त्रास दिला जात असल्याचे अर्जुन कोर्टापुढे सांगणार आहे. यावेळी निकाल अर्जुनच्या बाजूने लागणार असून, महिपत शिखरे हा आरोपी ठरणार आहे. तर, त्याला शिक्षा ठोठावण्यात येणार असून, प्रताप यांची निर्दोष सुटका होणार आहे. आता प्रताप सुभेदार यांना घेऊन सुभेदार कुटुंब मानाने घरी परतणार आहे. तर, सायलीला सगळा दोष दिल्यामुळे प्रताप सुभेदार यांना वाईट वाटत आहे. ज्या मुलाला आपण इतकी दूषणे दिली, त्याने आज आपल्याला निर्दोष सिद्ध केलं,

## 'आई कुठे काय करते'मधील अभिनेता दिसणार 'नवरी मिळे हिटलरला'मध्ये

स्टार प्रवाह वाहिनीवरील 'आई कुठे काय करते' ही मालिका कायमच चर्चेत राहिलेली मालिका आहे. या मालिकेतील प्रत्येक कलाकाराने महाराष्ट्रारातील प्रेक्षकांच्या मनात घर केले आहे. या मालिकेतील एक कलाकार आता झी मराठी वाहिनीवरील मालिकेच दिसणार असल्याची माहिती समोर आली आहे. आपण आजवर अनेकदा पाहिले आहे की स्टार प्रवाह वाहीनवरील मालिका या कायमच झी मराठी वाहिनीवरील मालिकांना आवाहन देत असतात.

'आई कुठे काय करते' मालिकेतल काम करणारा अभिनेता अद्वैत कडणे हा सध्या चर्चेत आहे. अद्वैतने 'आई कुठे काय करते' मालिकेतील अरुंधतीची मुलगी ईशाच्या पहिल्या प्रियकराची भूमिका साकारली होती. त्याची ही भूमिका प्रेक्षकांच्या कायमच चर्चेत राहिली आहे. आता अद्वैतने नव्या मालिकेत दिसणार असल्याचे सांगितले आहे. पण तो स्टार प्रवाह वाहिनीवरील नाही तर झी मराठी वाहिनीवरील मालिकेत झळकणार आहे.

अद्वैत कोणत्या मालिकेत दिसणार?

अद्वैत कडणे हा लवकरच 'नवरी मिळे हिटलरला' या झी मराठी वाहिनीवरील मालिकेत दिसणार आहे. तो लीलाची धाकटी बहिण रेवतीच्या बॉयफ्रेंडची भूमिका साकारणार आहे. त्याच्या या व्यक्तीरेखेचे नाव विक्रांत असे आहे. आता प्रेक्षकांना मालिकेतील विक्रांतच्या भूमिकेची आतुरता लागली आहे.

'नवरी मिळे हिटलरला' मालिकेविषयी

'नवरी मिळे हिटलरला' या मालिकेत अभिनेता राकेश बापट महत्त्वाच्या भूमिकेत काम करत आहे. त्याच्या या नव्या मालिकेला प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. तसेच मालिकेची कथा प्रेक्षकांच्या विशेष पसंतीला उतरताना दिसत आहे.

अद्वैतच्या कामाविषयी

अद्वैतने यापूर्वी काही मालिकांमध्ये काम केले आहे. त्यामध्ये 'आई कुठे काय करते', 'जाऊ नको दूर बाबा!', 'फुलपाखरू', 'अग्निहोत्र २' चा समावेश आहे. आता



त्याच्या या नव्या मालिकेविषयी सर्वजण उत्सुक आहेत

## रंग नाका-तोंडात गेल्यामुळं घसा खवखवतोय? उपयुक्त आहेत हे घरगुती उपाय



होळीला रंग खेळल्यानंतर बहुतांश लोक शरीरावरील रंग काढण्यात व्यस्त असतात. तर काही लोकांची तब्येत बिघडते. अनेकदा लोकांना घशाचा त्रास होतो. खरं तर होळीच्या दिवशी लोक रंग खेळतात, पण कधी कधी या रंगांमुळे घशात समस्या निर्माण होतात. काहींना घसा खवखवतो. हे संसर्गाचे लक्षण आहे. या काळात घशात दुखणे, खवखवणे, थंडी वाजून येणे किंवा ताप येऊ शकतो. घसादुखीचा सामना कसा करावा, यापासून आराम मिळवण्यासाठी तुम्ही हे काही घरगुती उपाय करू शकता.

- ज्येष्ठमध शरीरासाठी खूप फायदेशीर आहे. घसा खवखवल्यास ज्येष्ठमधाचा एक छोटा तुकडा तोंडात ठेवा आणि हळू हळू चोखत रहा.

- घसादुखीपासून आराम मिळवण्यासाठी प्रथम पाण्यात एक किंवा दोन चिमूटभर मीठ टाका आणि नंतर पाणी कोमट करा. यानंतर एक ग्लास कोमट पाण्याने सुमारे पाच मिनिटे गार्गल करा.

केश्रळ २०२४: रंग काढण्यासाठी हे आहेत बेस्ट पद्धती, नखांचा रंगही लगेच निघेल

- घसादुखी दूर करण्यासाठी आले सोलून पाण्यात टाका आणि थोडा वेळ उकळू द्या. पाणी अर्धे झाले की प्या. यामुळे घसा खवखवणे किंवा दुखत असल्यास खूप आराम मिळतो.

- मधामध्ये अँटीबॅक्टेरियल आणि अँटी-इंफ्लेमेटरी गुणधर्म आढळतात जे घसा खवखवणे, घसा दुखणे, खोकला आणि सर्दीपासून मुक्त होण्यास प्रभावी आहेत. घसा दुखण्यापासून आराम मिळण्यासाठी गरम पाण्यात मध मिसळून प्या.

- लसूण देखील वेदना हाताळण्यास मदत करू शकते. गरम किंवा भाजलेला लसूण घशासाठी फायदेशीर आहे. यात

## बॉलीवूडची प्रसिद्ध अभिनेत्री दिया मिर्झाचा आगामी प्रोजेक्ट काय आहे? जाणून घ्या...



बॉलीवूडची प्रसिद्ध अभिनेत्री दिया मिर्झाचा नवा प्रोजेक्ट लवकरच प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे. या प्रोजेक्टमध्ये काही मराठी कलाकारांची वर्णी लागली आहे. या मराठी कलाकारांनी सोशल मीडियावर पोस्ट करून दियाच्या नव्या प्रोजेक्टची माहिती दिली आहे.

दिया मिर्झाची 'पन्हं' या नावाची नवीन शॉर्ट फिल्म भेटीस येत आहे. या शॉर्ट फिल्मची दिया ही निर्माती असून यामध्ये बरेच मराठी कलाकार झळकणार आहे. यात 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' फेम अभिनेता पृथ्वीक प्रताप पाहायला मिळणार आहे. यासंदर्भात त्याने सोशल मीडियावर पोस्ट शेअर केली. हृदयाच्या कोपऱ्यातला अत्यंत लाडका प्रोजेक्ट..'पन्हं', असं कॅप्शन लिहीत त्याने काही फोटो शेअर केले आहेत.

याशिवाय पृथ्वीकसह अभिनेत्री सायली संजीव देखील दियाच्या आगामी प्रोजेक्टमध्ये दिसणार आहे. तिने देखील इन्स्टाग्राम स्टोरीवर या प्रोजेक्टसंबंधित पोस्ट शेअर केली आहे. या प्रोजेक्टचा एक भाग होण्याचा मला खूप आनंद आहे, असं लिहून तिने एक फोटो शेअर केला आहे.

पृथ्वीक प्रताप व सायली संजीवबरोबर अभिनेता सुहास शिरसाट देखील 'पन्हं' या शॉर्ट फिल्ममध्ये झळकणार आहे. यासंदर्भात सुहासने इन्स्टाग्राम स्टोरी शेअर केली आहे. एका दमदार टीमबरोबर नवीन काम, असं लिहितं अभिनेत्याने क्लॅपचा फोटो शेअर केला आहे.

## 'स्वातंत्र्यवीर सावरकर' सिनेमासाठी प्रविण तरडेची खास पोस्ट

'स्वातंत्र्यवीर सावरकर' हा चित्रपट सध्या चर्चेत आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन बॉलिवूड अभिनेता रणदीप हुड्डाने केले आहे. तसेच या चित्रपटात तो स्वत: मुख्य भूमिकेत दिसत आहे. या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर फारशी कमाई केलेली नाही. पण या चित्रपटासाठी अनेक कलाकार पोस्ट करताना दिसत आहेत. नुकताच मराठमोळे अभिनेते प्रवीण तरडे यांनी या चित्रपटासाठी केलेली पोस्ट चर्चेत आहे.

प्रवीण तरडेंनी त्यांच्या अधिकृत सोशल मीडिया अकाऊंटवर 'स्वातंत्र्यवीर सावरकर' या चित्रपटाचे पोस्टर शेअर केले आहे. हे पोस्टर शेअर करत '।। धर्मो रक्षति रक्षित:।। अफाट अचाट आयुष्य जगलेल्या, जातीपातीला गाडण्यासाठी झटलेल्या, महान व्यक्तीमत्वाची प्रेरणादायी गोष्ट. ताबडतोब बघावा असा तडाखेबंद सिनेमा,' असे कॅप्शन दिले आहे. सोशल मीडियावर प्रवीण तरडेंची ही पोस्ट तुफान व्हायरल झाली आहे. अनेकांनी कमेंट करत हा चित्रपट पाहण्याचा सल्ला दिला आहे.

'स्वातंत्र्यवीर सावरकर' या चित्रपटासाठी रणदीप हुड्डाने प्रचंड मेहनत घेतली आहे. त्याने जवळपास ३० किलो वजन कमी केले. त्याच्या या बॉडी ट्रान्सफॉर्मेशनचा फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाला होता. सर्वात आधी या चित्रपटाचे दिग्दर्शन महेश मांजरेकर करणार होते. मात्र, काही मतभेद झाल्यामुळे त्यांनी चित्रपटातून काढता पाय घेतला. त्यानंतर रणदीपने दिग्दर्शनाची धुरा सांभाळली.

'स्वातंत्र्यवीर सावरकर' चित्रपटाच्या कमाई विषयी

'स्वातंत्र्यवीर सावरकर' हा चित्रपट २२ मार्च रोजी प्रदर्शित झाला. या चित्रपटाने पहिल्या दोन दिवशी जेमतेम कमाई केली. पहिल्या दिवशी १.०५ कोटी, दुसऱ्या दिवशी २.२५ कोटी, तिसऱ्या दिवशी २.५० कोटी रुपयांची कमाई चित्रपटाने केली. गेल्या चार दिवसात चित्रपटाने ८.२५ कोटी रुपयांची कमाई केली आहे. चित्रपट बॉक्स ऑफिसवर फारशी कमाई करत नसल्याचे दिसत आहे.

'स्वातंत्र्य वीर सावरकर' या चित्रपटाविषयी बोलायचे झाले तर अभिनेता रणदीप हुड्डाने सावरकरांची भूमिका साकारली आहे. तर अभिनेत्री अंकिता लोखंडे सावरकरांच्या पत्नीच्या भूमिकेत दिसत आहे.




सावरकरांचा जीवनप्रवास या चित्रपटात दाखवण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. मराठी भाषेतील चित्रपटाला अभिनेता सुबोध भावेने आवाज दिला आहे. मराठी आणि हिंदी अशा दोन्ही भाषेत प्रदर्शित झालेल्या चित्रपटाला प्रेक्षकांचा फारसा प्रतिसाद मिळाला नाही.

# आयर्लंडच्या पंतप्रधानपदी सायमन हॅरिस ?



**लंडन :** आयर्लंडच्यापंतप्रधानपदावरून लिओ वराडकर पायउतार होताच आता या पदावर सायमन हॅरिस यांची नियुक्ती निश्चित मानली जात आहे. हॅरिस हेआयर्लंडचेसर्वांत तरुण पंतप्रधान म्हणून ओळखले जातील. त्यांचे वय अवघे ३७ वर्षे आहे.

गेल्याच आठवड्यात लिओ वराडकर या मराठमोळ्या पंतप्रधानांनी पदाचा राजीनामा दिला. त्यानंतर झालेल्या सत्ताधारी फाइन गाएल पक्षाच्या बैठकीत सायमन हॅरिस यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले.सध्या हॅरिस ईस्टरच्या निमित्ताने सुटीवर आहेत.

त्यानंतर एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात त्यांच्या नावाची औपचारिक घोषणा होऊन ते पंतप्रधानपदाची शपथ घेऊ शकतात, असे सुत्रांनी सांगितले. वराडकर यांच्या जागी पक्षाने संधी दिल्याबद्दल हॅरिस यांनी पक्षाचे आभार मानले.

# पाकिस्तानमध्ये मोठा आत्मघातकी बॉम्ब हल्ला

## पाच चिनी इंजिनियर्ससह एकूण सहा जणांचा मृत्यू

**नवी दिल्ली :** पाकिस्तानातील खैबर पख्तुनख्वा येथे मंगळवारी एक मोठा आत्मघातकी हल्ला झाला. शांगला जिल्ह्यात या हल्ल्यात पाच चिनी नागरिकांसह सहा जणांचा मृत्यू झाला. मिळालेल्या माहितीनुसार, चिनी नागरिकांच्या वाहनांना लक्ष्य करून हा आत्मघाती हल्ला करण्यात आला. हा आत्मघातकी हल्ला अशा वेळी झाला, जेव्हा काही तासांपूर्वी बलुचिस्तान प्रांतातीलपाकिस्तानच्यादुसऱ्या क्रमांकाच्या नौदल तळावर दहशतवादी हल्ला झाला होता. यामध्ये एका जवानाचामृत्यूझाला. सुरक्षा दलांनी ४ दहशतवाद्यांचा खात्मा केला.

मिळालेल्या माहितीनुसार, खैबर पख्तूनख्वामधील शांगलाच्या बिशाम तहसीलमध्येस्फोटकांनीभरलेल्या वाहनाने दुसऱ्या वाहनाला धडक दिली. त्यानंतर मोठास्फोटझाला. या घटनेच्या समोर आलेल्या



छायाचित्रात स्फोटानंतर एक वाहन खड्ड्यात पडताना दिसले. स्फोटामुळे आग लागली. ज्या वाहनाला लक्ष्य करण्यात आले, त्यात अनेक चिनी नागरिक प्रवास करत होते, त्यापैकी ५ जणांचा मृत्यू झाला असल्याचे सांगण्यात येत आहे. त्याचवेळी आणखी एका नागरिकाचाही मृत्यू झाल्याची माहिती आहे.गेल्या दोन-तीन वर्षांत पाकिस्तानमध्ये चिनी नागरिकांवर हल्ले वाढले आहेत. आतापर्यंत डझनाहून अधिक हल्ले झाले आहेत. या हल्ल्यांमध्ये आतापर्यंत अनेक चिनी नागरिकांचा मृत्यू झाला आहे. सर्वाधिक हल्ले खैबर पख्तूनख्वा आणि बलुचिस्तान भागात झाले आहेत. नुकत्याच झालेल्या हल्ल्यावर चीनकडून अद्याप कोणतीही प्रतिक्रिया आलेली नाही. आतापर्यंत कोणीही हल्ल्याची जबाबदारी घेतलेली नाही.

दुसरीकडे, बलुचिस्तानमधील हल्ल्याबद्दल बोलायचे झाल्यास, या वर्षातील हा तिसरा मोठा हल्ला होता. या हल्ल्याची जबाबदारी बीएलएने घेतली आहे. यापूर्वीचे दोन्ही हल्लेही सुरक्षा दलांनी हाणून पाडले होते. वर्षाच्या सुरुवातीला माच शहरात सुरक्षा दलांवर हल्ला झाला होता ज्यात १० लोक मारले गेले. हल्लेखोरांनी कारागृहात घुसण्याचा प्रयत्न केला होता, तो सुरक्षा दलांनी हाणून पाडला.

# राहुल गांधींचे भविष्य अंधारात

**नवी दिल्ली :** लोकसभा निवडणूक २०२४च्या पहिल्या टप्प्यातील मतदानासाठी काही दिवसच शिल्लक आहेत. आसाममध्ये निवडणुकीआधी प्रचारात गुंतलेले राजकीय पक्ष आपल्या विरोधी पक्षांवर जोरदार हल्लाबोल करत आहेत. यातच आता आसामचे मुख्यमंत्री हिमंत बिस्वा सरमा यांनी काँग्रेस पक्षाचे खासदार राहुल गांधींवर हल्लाबोल केला आहे. राहुल गांधींचे भविष्य अंधारात असून २०२६ पर्यत काँग्रेस राहणार नाही असे त्यांनी म्हटले आहे.

सोमवारी विश्वनाथमध्ये पत्रकारांशी बोलताना ते म्हणाले, काँग्रेस पक्षाला मतदान करण्याचा अर्थ राहुल गांधींना मत देणे. भाजपला मत देण्याचा अर्थ नरेंद्र मोदींना मत देणे. जे लोक पंतप्रधान नरेंद्र मोदींवर प्रेम करतात आणि मानतात भारत हा विश्वगुरू बनावा ते या निवडणुकीत भाजपला मतदान करतील. जे लोक राहुल गांधींच्या नेतृत्वावर विश्वास ठेवतात त्यांना माहीत आहे की त्यांचे भविष्य अंधारात आहे.

# भूतानमध्ये भारताने बांधले रुग्णालय, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्घाटन

**थिम्पू :** भारताच्या सहकार्याने येथे उभारण्यात आलेल्या आधुनिक रुग्णालयाचे पंतप्रधाननरेंद्र मोदीआणिभूतानचेत्यांचे समपदस्थ शेरिंग टोबगे यांनी शनिवारी उद्घाटन केले. हे रुग्णालय महिला आणि बालकांना दर्जेदार आरोग्य सुविधा पुरवेल. 'ग्यालत्सुएन जेत्सुन पेमा वांगचुक माता व बाल रुग्णालय' हे १५० खाटांचे आधुनिक सुविधांनी युक्त रुग्णालय असून, ते भारताच्या सहायाने थिम्पू येथे उभारण्यात आले. ग्यालत्सुएन जेत्सुन पेमा वांगचुक माता आणि बाल रुग्णालयाचे आज उद्घाटन केले. दर्जेदार आरोग्य सुविधा उपलब्ध असलेले हे रुग्णालय अनेक कुटुंबांसाठी आशेचा किरण आहे, असे पंतप्रधान मोदी यांनी सोशल मीडियावरील पोस्टमध्ये



म्हटले आहे.

हे रुग्णालय निरोगी भावी पिढीच्या संगोपनाप्रतीच्या बांधिलकीचे प्रतीक आहे. आधुनिक सुविधांनी सुसज्ज असलेले हे रुग्णालय भारत-भूतानविकास सहकार्याचे ज्वलंत उदाहरण आहे. असे परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी सोशल मीडियावरील पोस्टमध्ये म्हटलेआहे.

या रुग्णालयाचे दोन टप्प्यांत बांधकाम करण्यात आले. भारताने पहिल्या टप्प्यासाठी २२ कोटी रुपयांचे अर्थसहाय दिले. दुसऱ्या टप्प्यासाठी भारताने १२ व्या पंचवार्षिक योजनेंतर्गत ११९ कोटी रुपयांची तरतूद केली. - २०१९ मध्ये सुरू झालेले या रुग्णालयाचे बांधकाम नुकतेच पूर्ण झाले आहे. इथे बालरोग, स्त्रीरोग, प्रसूती, भूलशास्त्र, शस्त्रक्रियागार, नवजात शिशु अतिदक्षता व बालरोग अतिदक्षता यासारख्या आधुनिक सुविधा असतील.

# भारतीय पर्यटकांसाठी सिंगापूरच्या पायघड्या

**सिंगापूर :** कोरोनाच्या लॉकडाऊननंतर येथे येणाऱ्या भारतीय पर्यटकांच्या संख्येमध्ये घट झाली होती. त्यामध्ये हळूहळू वाढ होऊ लागली आहे. भारतीय पर्यटकांची संख्या वाढावी यासाठी सिंगापूर पर्यटन मंत्रालयाने भारतीय पर्यटकांसमोर पायघड्या घातल्या आहेत. येथील हॉटेलमधील रूमची संख्या वाढविण्यात येणार असून अन्य काही सुविधाही उपलब्ध करून दिल्या जाणार असल्याची माहिती वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली आहे.

लॉकडाऊनपूर्वी सन २०१९ मध्ये १.४ दशलक्ष भारतीय पर्यटकांनी सिंगापूरला भेट दिली



होती. नंतर या संख्येमध्ये मोठी घट झाली. मात्र, आता पुन्हा भारतीयांचे सिंगापूरचे आकर्षण वाढले आहे. सन २०२३मध्ये भारतीय पर्यटकांची संख्या १.१ दशलक्षांवर पोहोचली आहे. भारतीय पर्यटकांमध्ये वाढ व्हावी यासाठी सिंगापूरने मुंबई आणि दिल्लीमध्ये दोन कार्यालयेही सुरू केली आहेत.

# इस्रो विद्यार्थ्यांना देणार अंतराळ संशोधन प्रशिक्षण

**हैदराबाद :** भारतीय अंतराळ संशोधन संस्थेने मंगळवारी अंतराळ कार्यक्रम जाहीर केला आहे. या कार्यक्रमात भारतीय अंतराळ संशोधन संस्थेने विद्यार्थ्यांसाठी विशेष कार्यक्रम जाहीर केला आहे. या कार्यक्रमात इस्रोने स्पेस सायन्स अँड टेक्नॉलॉजी अवेअरनेस ट्रेनिंग २०२४ ची घोषणा केली. या कार्यक्रमानुसार, आता विद्यार्थ्यांनाही अंतराळ संशोधनाचं प्रशिक्षण घेता येणार आहे.

इस्रोने सुरू केलेले डढअठढ म्हणजे नेमके काय आहे ? : भारतीय अंतराळ संशोधन संस्था इस्रोने विद्यार्थ्यांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम सुरू केला आहे. या कार्यक्रमानुसार पदवीला असलेले आणि पदव्युत्तर विद्यार्थ्यांना अंतराळ विज्ञान आणि तंत्रज्ञानचं ऑनलाईन प्रशिक्षण देण्यात येणार आहे. अंतराळ विज्ञान आणि तंत्रज्ञान जागरुकता प्रशिक्षण २०२४ कार्यक्रम एप्रिल-मे २०२४ दरम्यान आयोजित करण्यात येणार आहे. भारतीय अंतराळ संशोधन संस्थेनं सुरू केलेल्या या कार्यक्रमात ग्रह, विज्ञान, सूर्य, पृथ्वी, खगोलशास्त्र, खगोल भौतिकशास्त्र मायक्रोग्रॅविटी आदी विषयाचा समावेश आहे.

काय आहे 'स्टार्ट' कार्यक्रमाचं उद्दिष्ट : भारतीय अंतराळ संशोधन संस्थेनं सुरू केलेला स्टार्ट हा कार्यक्रम सुरू केल्यानं विद्यार्थ्यांना त्याचा अंतराळ अभ्यास करणयासाठी फायदा होणार आहे. विद्यार्थ्यांना अंतराळ विज्ञान आणि तंत्रज्ञानाकडं आकर्षित करणं, हा या प्रशिक्षणामागचा हेतू आहे. या प्रशिक्षणात अंतराळ विज्ञान आणि प्राथमिक स्तरावरील माहितींचा समावेश असणार आहे. भारतीय अंतराळ संशोधन आणि संशोधन संधी यावर या प्रशिक्षण कार्यक्रमात सत्रं असणार आहेत.

काय आहेत स्टार्ट प्रशिक्षणासाठी पात्रतेचे निकष : भारतीय अंतराळ संशोधन संस्थेनं सुरू केलेला स्टार्ट हा कार्यक्रम विद्यार्थ्यांना अंतराळ संशोधनात संधी निर्माण करणारा आहे. त्यासाठी पदव्युत्तर विद्यार्थी हा भौतिकशास्त्र आणि रसायनशास्त्र या विषयाचा असावा. किंवा तंत्रज्ञान विषयाच्या पदव्युत्तर विद्यार्थ्यानं इलेक्ट्रॉनिक्स, कॉम्प्युटर सायन्स, मेकॅनिकल, अप्लाइड फिजिक्स, रेडिओफिजिक्स, ऑप्टिक्स आणि ऑप्टो-इलेक्ट्रॉनिक्स, इन्स्ट्रुमेंटेशन आदी संबंधित विषयाला प्रवेश घेतलेला असावा. विविध शैक्षणिक संस्थांमध्ये शिकणाऱ्या अंतिम वर्षाच्या पदवीच्या विद्यार्थ्यांचाही अंतराळ संशोधन संस्थेच्या प्रशिक्षणासाठी विचार केला जाईल, असेही इस्रोने स्पष्ट केले आहे.

# बाल्टिमोर ब्रिज कोसळले

## रात्रीच्या अंधारात जहाजाची धडक; २० कामगार बुडाल्याची शक्यता



अमेरिकेतील मेरिलँडमध्ये एक मोठी दुर्घटना घडली आहे. महत्वाच्या बाल्टिमोर ब्रिजला मोठ्या जहाजाची धडक बसल्याने ते कोसळले आहे. या घटनेवेळी पुलावर २० कामगार काम करत असल्याचे सांगितले जात आहे. या दुर्घटनेत अनेकजण बुडाल्याचे सांगितले जात आहे.- ऊाएठढखडएचएछढस्थानिक वेळेनुसार मंगळवारी पहाटे दीड वाजता हाअपघातघडला आहे. याअपघाताचेव्हिडीओ समोर आले आहेत. पाटाप्सको नदीवरील ही घटना आहे. या नदीवर दोन बाजुंना जोडणारा स्टीलचा ब्रिज बांधलेला होता. या खालून जहाजांची येजा होत होती. परंतु, आज एक जहाज पुलाच्या खांबावरच जाऊन धडकले आहे. या पुलावर कामगारांसोबतच वाहनांची येजा देखील सुरु होती. यामुळे किती वाहने पाण्यात कोसळली आहेत, याचा आकडा अद्याप समोर आलेला नाही. कमीतकमी सात लोक पाण्यात फेकलेगेल्याची माहिती शहराच्या अग्निशमन विभागाने दिली आहे.

# बराक ओबामा ISIS चे संस्थापक

## मॉस्कोतील मृतांना तेच जबाबदार, डोनाल्ड ट्रम्प यांचा व्हीडिओ व्हायरल!

रशियातील मॉस्कोमध्ये नुकताच दहशतवादी हल्ला झाला. हा हल्ला घडवून आणलेल्या दहशतवादी संघटनेतील आरोपींना अटक करण्यात आली आहे. परंतु, डोनाल्ड ट्रम्प यांनी या हल्ल्याला अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा यांना जबाबदार धरलं आहे. तसंच, बराक ओबामा आयएसआयएसचे संस्थापक असल्याचंही डोनाल्ड ट्रम्प म्हणाले आहेत. त्यांचा एक व्हीडिओ यासंदर्भातील व्हायरल झाला आहे.

अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचा एक व्हीडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. या व्हायरल व्हीडिओमध्ये डोनाल्ड ट्रम्प यांनी बराक ओबामा यांच्यावर अनेक आरोप केले आहेत. बराक ओबामा हे आयएसआयएसचे संस्थापक आहेत. आयएसआयएस ओबामांचा सन्मान करतं. बराक ओबामा यांनीच आयएसआयएसची स्थापना केली आहे. तर, हिलरी



क्लिंटन या संस्थेच सहसंस्थापक आहेत, असं डोनाल्ड ट्रम्प या व्हीडिओमध्ये म्हणाले आहेत.

दरम्यान, हा व्हिडीओ नवा नसून जुना व्हीडिओ आहे. २०१६ मध्ये अध्यक्षीय निवडणुकीदरम्यान डोनाल्ड ट्रम्प यांनी हे वक्तव्य केलं होतं. परंतु, आता मॉस्कोच्या हल्ल्यानंतर हा व्हीडिओ व्हायरल झाला.

मॉस्को हल्ल्याप्रकरणी चौघांचा कबुलीजबाब

रशियातील एका सभागृहात १३० जणांना ठार करणारा हल्ला घडवून आणल्याचा आरोप असलेल्या चौघांना रविवारी मॉस्कोतील एका न्यायालयात हजर करण्यात आले. या चौघांच्या अंगावर बेदम मारहाण करण्यात आल्याच्या खुणा होत्या. एकजण सुनावणीदरम्यान जेमतेम शुद्धीत होता.

दोन आरोपींनी या हल्ल्यासाठी आपण दोषी असल्याचे न्यायालयाच्या निवेदनात म्हटले आहे. मात्र, या लोकांची परिस्थिती पाहता ते मुक्तपणे बोलत होते का याबाबत प्रश्नचिन्ह लागले आहे.

# मॉस्कोतील हल्ल्याची दोघांनी दिली कबुली

## चार जणांना न्यायालयात केले हजर

**मॉस्को :** रशियात कॉन्सर्ट हॉलमध्ये झालेल्या दहशतवादी हल्लाप्रकरणी अटक करण्यात आलेल्या चौघांना रविवारी मॉस्को न्यायालयात हजर करण्यात आले. यापैकी दोघा संशयितांनी या प्राणघातक हल्ल्यात सहभागाची कबुली दिली आहे. कॉन्सर्टमध्ये झालेल्या या हल्ल्यात १३० हून अधिक जणांचा मृत्यू झाला होता. अटक केलेल्यांपैकी तिघांनी गुन्ह्याची कबुली दिल्याचे आधी सांगण्यात आले होते.- ऊाएठढखडएचएछढयाबाबत सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, दोघा संशयितांनी प्राणघातक हल्ल्यात त्यांचा सहभाग असल्याची कबुली दिली आहे. तपास यंत्रणांनी डेलरडजॉन मिर्जोयेव (३२), सईदाक्रामी रचाबलीजोडा (३०), शम्सीदीन फरीदुनी (२५) आणि



मुखमदसोबीर फैजोव (१९) या चौघांना दहशतवादी हल्ल्यात सहभाग असल्याच्या आरोपावरून अटक केली होती. हे सर्व संशयित ताजिकिस्तानचे नागरिक आहेत.मॉस्कोच्या बासमन्नी जिल्हा न्यायालयाने या संशयितांना २२ मेपर्यंत चौकशीसाठी कोठडीत ठेवण्याचा आदेश दिला आहे. न्यायालयीन अधिकाऱ्यांनी सांगितले की, मिर्जोयेव आणि रचाबलिजोडा यांना हल्ल्यासाठी दोषी ठरविण्यात आले आहे. या प्रकरणी अटक झालेला चौथा संशयित फैजोव याला हॉस्पिटलमधून व्हीलचेअरवरून न्यायालयात आणले होते. न्यायालयीन कार्यवाहीदरम्यान, तो डोळे बंद करून बसून होता. सुनावणीदरम्यान, आरोग्य कर्मचाऱ्यांनी त्याची देखभाल केली. दहशतवादी हल्ल्यादरम्यान, सुरक्षा यंत्रणेला तपासावेळी एका शौचालयात २८ जणांचे मृतदेह आढळून आले होते.

दहशतवाद्यांनी गोळीबार केल्यानंतर पेट्रोल ओतून कॉन्सर्ट हॉलला आग लावली होती. काहीजणांचा मृत्यू गोळी लागून झाला असला तरी बहुसंख्य जणांचा मृत्यू आगीमुळे झाल्याचे तपास यंत्रणांना आढळून आले आहे.कॉन्सर्टच्या ठिकाणी, उपनगरातील क्रोकस सिटी हॉलमध्ये शुक्रवारी झालेल्या या हल्ल्याबद्दलरशियातराष्ट्रीय शोक दिन पाळण्यात आला. इस्लामिक स्टेट गटाशी संलग्न असलेल्या गटाने हल्ला केल्याचा दावा करण्यात आला आहे. गेल्या काही वर्षांत रशियात झालेला हा सर्वांत प्राणघातक हल्ला मानला जात आहे.रविवारी सांस्कृतिक संस्थांमधील कार्यक्रम रद्द करण्यात आले. दरम्यान, मॉस्कोच्या आरोग्य विभागाने रविवारी सांगितले की डीएनए चाचणीद्वारे मृतांची ओळख पटविण्यास सुरुवात केली आहे आणि या प्रक्रियेस किमान दोन आठवडे लागतील. पुतिन यांनी या हल्ल्याला 'एक रक्तरंजित, रानटी दहशतवादी कृत्य' असे म्हटले आहे.

# काँग्रेसचा रावत कुटुंबीयांवर विश्वास कायम; दोन पराभवांनंतरही हरिद्वारमधून उमेदवारी

**हरिद्वार :** हरिद्वारमधून काँग्रेसने माजी मुख्यमंत्री हरीश रावत यांचे पुत्र वीरेंद्र रावत यांना उमेदवारी दिली आहे. मात्र, मुलाच्या उमेदवारीसाठी हरीश रावत यांनी पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांवर दबाव आणल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. महत्त्वाचे म्हणजे मागील दोन निवडणुकांत हरिद्वारमध्ये काँग्रेसचा पराभव झाला आहे. तरीही काँग्रेसने रावत कुटुंबीयांवर विश्वास दाखवल्याने विविध राजकीय चर्चांनाही उधाण आले आहे.

वीरेंद्र रावत हे राजकारणात येणारे रावत कुटुंबातील चौथे सदस्य आहेत. यापूर्वी हरीश रावत यांच्या पत्नी रेणुका रावत यांनी २००४ आणि २०१४ मध्ये अनुक्रमे अल्मोडा आणि हरिद्वारमधून लोकसभा निवडणूक लढवली होती. मात्र, या दोन्ही निवडणुकांत त्यांना पराभवाचा सामना करावा लागला होता.

याशिवाय हरीश रावत यांची मुलगी अनुपमा रावत यांनी २०२२ मध्ये काँग्रेसच्या तिकिटावर विधानसभेची निवडणूक लढवली होती. या निवडणुकीत त्यांनी भाजपाचे आमदार स्वामी यतीश्वरानंद यांचा पराभव केला होता. मात्र, याच निवडणुकीत हरीश रावत यांचा लालकुआन मतदारसंघात पराभव झाला होता. २०१७ मध्ये झालेल्या पराभवानंतर हरीश रावत यांच्यासाठी ही निवडणूक अतिशय महत्त्वाची होती.

दरम्यान, हरीश रावत हे काही वर्षांपासून मुलाच्या उमेदवारीसाठी काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांवर दबाव आणत असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. मात्र, हरीश रावत यांनी या आरोपांचे खंडन केलं आहे. या संदर्भात त्यांनी फेसबुक पोस्ट केली आहे. वीरेंद्र यांचे पक्षाप्रति असलेले समर्पण आणि कठोर मेहनत यांच्या भरवशावर त्यांना तिकीट मिळाल्याचे त्यांनी म्हटलं आहे. तसेच सेवा, समर्पण, समन्वय, संघटनात्मक कौशल्ये आणि विकासात्मक दृष्टी या बाबतीत वीरेंद्र माझ्या तुलनेत कमी पडणार नाहीत हे मी पूर्ण विश्वासाने सांगतो, असेही ते म्हणाले.वीरेंद्र रावत यांनी दिल्लीत आपले महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण केले. महाविद्यालयात असतानाच ते एनएसयूआयशी जोडले गेले. तिथूनच त्यांनी त्यांच्या राजकीय कारकिर्दीला सुरुवात केली होती. ते एनएसयूआयच्या दिल्ली विभागाचे सरचिटणीसही होते. त्यानंतर त्यांनी उत्तराखंडमध्ये परत येऊन युवक काँग्रेसबरोबर काम केले. सध्या ते उत्तराखंड प्रदेश काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष आहेत.